POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३३४ ● मुंबई, शनिवार, ०५ जूलै २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महाराष्ट्रात मराठीवरुन वातावरण पेटलं असतानाच
# एकनाथ शिंदेंकडून 'जय गुजरात'ची घोषणा

**■सोलापूर | प्रतिनिधी :**
राज्यात मराठी बोलण्यावरुन वातावरण पेटलं असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'जय गुजरात' अशी घोषणा दिली आहे. राज्यातील शाळांमध्ये हिंदी शिकवण्यावरुन सुरु झालेला वाद आता मराठी भाषेच्या अस्मितेपर्यंत पोहोचला आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाला मराठी आलं पाहिजे असा आग्रह केला जात असतानाच, एकनाथ शिंदे यांच्या एका विधानाने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह प्रमुख पाहुणे असणाऱ्या कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांनी भाषण संपवताना 'जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात' अशी घोषणा दिली. यामुळे आता त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज पुणे दौऱ्यावर आहेत. अमित शाह यांच्या उपस्थितीत जयराज स्पोर्ट्स व कन्व्हेन्शन सेंटरचा उद्घाटन समारंभ पार पडला. यावेळी भाषण करताना एकनाथ शिंदे यांनी 'जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात' अशी घोषणा दिली.

''या वास्तूचं भूमिपूजन नरेंद्र मोदी यांनी केलं आणि लोकार्पण अमित शहा यांनी केलं. मोदींनी हाती घेतलेले काम नेहमीच पूर्णत्वास जातं. गुजराती बांधव हे लक्ष्मीपुत्रच आहेत. एकता आणि अखंडतेचे हे प्रतीक आहे. अमित शाह हे देशसेवा आणि राष्ट्र सेवा याने समर्पित आहेत. अमित शाह यांनी राष्ट्रहिताला महत्व दिलं आहे. नवीन भारत निर्माण करण्यासाठी मोदींच्या बरोबरीने आहोत. माज्या निर्णयात अमित शाह दगडासारखे माझ्या मागे उभे होते,'' असं कौतुक एकनाथ शिंदे यांनी केलं.

''अमित शाह महाराष्ट्राचे जावई आहेत. कारण त्यांच्या होम मिनिस्टर कोल्हापू च्या आहेत. गुजराती बांधवांनी एकजूट कायम ठेवावी राज्याच्या प्रगतीमध्ये तुमचा वाटा आहे,'' असं सांगत एकनाथ शिंदे यांनी शायरीच्या माध्यमातून अमित शाहांवर स्तुतीसुमनं उधळळी. दरम्यान भाषण संपवताना एकनाथ शिंदे यांनी 'जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात' अशी घोषणा दिली.





### एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंचा व्हिडिओ दाखवत दिलं स्पष्टीकरण

एकनाथ शिंदेंनी पुण्यात जयराज स्पोर्ट्स व कन्व्हेन्शन सेंटरचा उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमात जय गुजरात असं म्हटलं होत. शिंदे आपल्या भाषणात म्हणाले होते की, ह्या वास्तूचे भूमिपूजन नरेंद्र मोदी यांनी केले आणि लोकार्पण अमित शहा यांनी केले. मोदींनी हाती घेतलेले काम नेहमीच पूर्णत्वास जाते. अमित शाह हे देशसेवेसाठी समर्पित आहेत राज्याच्या प्रगतीमध्ये तुमचा वाटा आहे. यानंतर भाषण संपवताना एकनाथ शिंदे यांनी जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात अशी घोषणा दिली. यानंतर विरोधकांनी शिंदेंवर टीका केली होती. यावर एकनाथ शिंदेंनी स्पष्टीकरण दिलं आहे. एकनाथ शिंदे म्हणाले की, ह्यपुण्यातील गुजराती बांधवांनी एक कॉम्प्लेक्स उभारलं आहे. याचं आज लोकार्पण करण्यात आले. माज्या भाषणाच्या शेवटी मी जय हिंद, जय महाराष्ट्र असं म्हणतो. जय हिंद म्हणजे देशाच्या अभिमान, जय महाराष्ट्र म्हणजे राज्याचा अभिमान. आज पुण्यातील गुजराती लोकांसाठी कार्यक्रम होता. गुजराती लोकांनी महाराष्ट्राला कर्मभुमी मानली आहे, त्यामुळे मी शेवटी जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात असं म्हटलो.ह्ल यानंतर पुढे बोलताना एकनाथ शिंदे यांनी ह्यउद्धव ठाकरेंचा एक व्हिडिओ जुना व्हिडिओ दाखवला, ज्यात उद्धव ठाकरे हेही जय हिंद, जय महाराष्ट्र, जय गुजरात असं म्हणत आहे. तसेच शिंदेंनी आणखी एक पत्र दाखवले, ज्यात मुंबई मा जलेबी आणि फाफडा, उद्धव ठाकरे आपडा असं लिहिलेलं आहे. त्याचबरोबर आदित्य ठाकरेंचा एक पोस्टर दाखवत त्यावर केम छो वरळी असं लिहिलेलं आहे असंही शिंदेंनी सांगितलं. पुढे बोलताना शिंदे यांनी म्हटलं की, ह्यजे आमच्यावर बोलत आहेत, त्यांनी आरसा पहावा, मराठी बद्दल आम्हाला शिकवण्याची गरज नाही. निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन राजकारण केलं जात आहे. गुजरात पाकिस्तानमध्ये आहे का? बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघेंच्या विचारांची ही शिवसेना आहे. त्यामुळे मी आधी जय हिंद म्हणालो, जय महाराष्ट्र म्हणालोह्ल असं एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.

# नेमकं कसं असणार नियोजन?
## विजयी मेळाव्यात राज-उद्धव यांच्यासह कोणकोणते नेते भाषण करणार?

**■सोलापूर | प्रतिनिधी :**
त्रिभाषा धोरणाबाबतचा जीआर सरकारने रद्द केल्यावर आता ५ जुलैला ठाकरेंची शिवसेना आणि मनसे विजयी मेळावा साजरा करणार आहेत. मुंबईतील वरळी डोम येथे ठाकरेंची शिवसेना आणि मनसे यांचा भव्य एकत्रित मेळावा होणार आहे. विजयी मेळाव्याच्या निमित्ताने उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच व्यासपीठावर पाहायला मिळणार आहेत. उद्या सकाळी ११.३० वाजता राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे डोम ला पोहोचतील. दरम्यान, या विजयी रॅलीत कोणकोणते नेते भाषण करणार आहेत, याबाबतची माहिती मिळाली आहे.

**वरळीच्या परिसरात लागले मराठी भाषेचे फलक**

ठाकरे बंधूंचा विजय मेळावा उद्या वरळी डोममध्ये पार पडणार आहे. सध्या या ठिकाणी जोरदार तयारी सुरू आहे. ८ हजार क्षमतेचा हा डोम सजवला जात असून, व्हीआयपी रांगांचीही आखणी केली जात आहे. मराठी भाषेचे फलक परिसरात लावण्यात आले आहेत. या मेळाव्यासाठीची स्टेज संपूर्णपणे भगव्या रंगात सजवली जात असून, झेंडूच्या फुलांनी स्टेजला खास आकर्षक स्वरूप देण्यात येत आहे. उद्या नेमकं ठाकरे बंधू काय बोलतात, युतीबाबत काही संकेत देतात का, हे पाहणं अत्यंत महत्त्वाचं ठरणार आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी एक पत्रक काढत सर्वांना आव्हान केलं आहे. आवाज मराठीचा...असं म्हणत मराठी मातांनो, भगिनींनो आणि बांधवांनो, सरकारला नमवलं का? तर हो नमवलं..., कोणी नमवलं तर ते तुम्ही, मराठी जनांनी नमवलं...आम्ही फक्त तुमच्या वतीने संघर्ष करत होतो. त्यामुळे हा आनंद साजरा करतानासुद्धा, आम्ही फक्त या मेळाव्याचे आयोजक आहोत, बाकी जल्लोष तुम्ही करायचा आहे. वाजत गाजत या, जल्लोषात, गुलाल उधळत या...आम्ही वाट बघतोय..., असं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.



### हे करणार भाषण

उद्या होणाऱ्या विजयी मेळाव्यात प्रकाश रेड्डी, जयंत पाटील (शेतकरी पक्ष), सुप्रिया सुळे, राज ठाकरे, उद्धव ठाकरे अशी भाषणं होणार आहेत. जर काँग्रेसचे नेते आले तर त्यांना देखील भाषण करण्याची संधी दिली जाणार आहे. शेवटचं भाषण उद्धव ठाकरे यांचं असणार आहे. डोमच्या बाहेर हाजी अली, वरळीला जाणारे दोन्ही रस्ते पॅक होतील. तिथे स्क्रीन लावली जाणार आहे. बहुदा दोन्ही मार्ग वाहतुकीसाठी बंद केले जाण्याची शक्यता आहे.

# ३ महिन्यात ७६७ बळीराजांचा अखेरचा रामराम

**■बदलापूर | प्रतिनिधी :**
स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर ही बळीराजाचा कोणीच वाली नसल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रात खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरू झाले आहे. गेल्या ३ महिन्यात राज्यात ७६७ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे . या आकड्यांनी सर्वसामान्यांच्या जीवाची कालवाकालव सुरू आहे. विदर्भात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अमरावती विभागात आत्महत्येच्या आकड्यांनी खळबळ उडवली आहे. पावसाची सातत्याने हुलकावणी अथवा बेमौसमी पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला. पीक हाती न लागल्याने, कर्ज आणि खर्चाचा डोंगर वाढल्याने शेतकऱ्यांचे उरलंसुरलं आवसान गळालं आहे. १७ जून रोजी अकोला जिल्ह्यातील नीमकरदा गावातील ५८ वर्षीय शेतकरी देवानंद इंगळे यांनी शेतातील झाडाला दोर लावून गळफास घेतला.

देवानंद इंगळे यांच्या पत्नीला कँसर होता. तिच्या उपचारासाठी त्यांना मोठा खर्च करावा लागला. या कुटुंबाकडे अवघी दीड एकर शेती आहे. गेल्या काही वर्षांपासून हातातोंडाला आलेले पीक निसर्गाच्या लहरीपणामुळे हाती लागले नाही. पत्नीच्या उपचारासाठी पैसे लागत असल्याने बचत फारशी नव्हती. त्यांच्यावर बँकेचे १५ हजार तर सावकार आणि नातेवाईकांचे २० हजार रुपये कर्ज होते. हे कर्ज फेडण्यासाठी सुद्धा त्यांच्याकडे काहीच उरले नव्हते. शेतात पेरणी करणे सुद्धा अवघड झाल्याने अखेर त्यांनी टोकाचे पाऊल उचलले.

आता घरी विक्की इंगळे आणि त्याची पत्नी आहे. ''दीड एकर शेतावर घर चालवणे अवघड आहे. आईच्या इलाजासाठी मोठा खर्च आला. त्यात पिक हाती लागत नाही. घर खर्च, उपचार, औषधांचा खर्च चालवण्यासाठी दुर्सयाच्या शेतात मजुरी करावी लागते. बँक, सावकार यांचा तगादा सुरू आहे. हे सर्व त्यांच्या सहनशक्ती पलीकडे झाले होते. त्यांनी यामुळेच हे टोकाचे पाऊल उचलले. सरकार तर आमच्याकडे पाहत सुद्धा नाही'', अशी प्रतिक्रिया त्याने दिली.

याच परिसरातील टाकळी येथील माया वानखेडे यांनी सरकारच्या धोरणांवर रोष व्यक्त केला. शेतकरी आत्महत्येपूर्वी वारंवार त्यांच्या अडचणी सरकार दरबारी मांडतो. पण त्याला नागवले जाते. सरकार त्याच्याकडे लक्ष देत नाही. मग शेतकरी आत्महत्या करतो, ४० हजाराच्या कजार्साठी पतीने आत्महत्या केली. सरकारने एक लाख रुपेय मदत दिली. पण कुंकू पुसल्यावर त्या मदतीचा, कर्जमाफीचा काय फायदा? असा जळजळीत सवाल त्यांनी केला. वेळेवर कर्जमाफी मिळणे, शेतकऱ्यांना हमीभाव मिळणे, स्वस्तात पीक विमा मिळणे, सिंचनाची सोय करणे या मूलभूत गरजाही पूर्ण होत नसल्याने शेतकरी आत्महत्येकडे वळत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.



### विधीमंडळात सरकारने सादर केली आकडेवारी

- विदर्भ आणि मराठवाडा मधील शेतकऱ्याच्या आत्महत्येची आकडेवारी विधिमंडळातील उत्तरातून समोर आली.
- मिार्च २०२५ मध्ये विदर्भ आणि मराठवाड्यात २५० शेतकर्यांनी आत्महत्या केली तर एप्रिल २०२५ मध्ये २२९ शेतकर्यांच्या आत्महत्या झाल्याची सरकारची कबुली
- मिार्च २०२५ मध्ये २५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली त्यापैकी १०२ प्रकरण शासन निर्णयाच्या निकषनुसार पात्र ठरलेत. ६५ प्रकरण अपात्र झाले तर ८६ प्रकरण चौकशीसाठी प्रलंबित आहेत
- एप्रिल २०२५ मध्ये २२९ आत्महत्या झाल्यात त्यापैकी ७४ प्रकरण पात्र ठरलेत ३१ प्रकरण अपात्र तर १२४ प्रकरणा चौकटीसाठी प्रलंबित आहेत
- दोन महिन्यातील विदर्भ आणि मराठवाड्यातील आकडेवारी हादरवणारी

# थॅलसेमियामुक्त भारतासाठी रोटरी क्लब अंबडचा स्तुत्य उपक्रम

**■नाशिक | प्रतिनिधी :**
रोटरी क्लब अंबडच्या वतीने थॅलसेमिया या गंभीर आजारासंदर्भात जनजागृतीसाठी एक विशेष कार्यक्रम हॉटेल सूर्या, नाशिक येथे पार पडला.कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून आश्रय ट्रस्ट चे आरोग्य विभागाचे अध्यक्ष प्रा. प्रकाश पांगम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, थॅलसेमिया मेजर या आजारावर कोणताही उपचार उपलब्ध नाही.

हा अनुवंशिक आजार असून आई-वडिलांच्या दोषयुक्त गुणसूत्रांमुळे मुलांमध्ये येतो. त्यामुळे लग्नाआधी रक्त तपासणी करून थॅलसेमिया स्टेटस जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, थॅलसेमिया मायनर असलेली व्यक्ती दुसऱ्या थॅलसेमिया मायनरशी लग्न केल्यास त्यांच्या मुलांना थॅलसेमिया मेजर होण्याचा गंभीर धोका असतो. अशा मुलांना दर महिन्याला रक्त चढवावे लागते, आणि तरीही त्यांचे आयुष्य बहुतेक वेळा २० वर्षांपर्यंतच मर्यादित असते. यामुळे देशभरातील रक्तपेढ्यांवरही ताण येतो. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. धनंजय अहिरे यांनी थॅलसेमिया मुक्त भारत अभियान राबवण्याचे महत्व अधोरेखित करताना सांगितले की, ''अशा अभियानात रोटरी सारख्या संस्थांची सक्रीय भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे आणि आम्ही पूर्ण ताकदीने या अभियानात सहभागी आहोत.''

डॉ. मनोज चोरडिया यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेजर डी. के. झरेकर, जयंत पवार, संतोष भट, डॉ. निळकंठ निकम, पी. डी.जी. दादासाहेब देशमुख, सोनाली अहिरे, एन.टी. गाजरे, चारुदत्त रायते आणि जे.आर. वाघ यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सचिव उमेश कोठावळे यांनी केले.






# पुणे-बंगळुरु महामार्गावर पुण्यातल्या डॉक्टर महिलेची आत्महत्या

**■पुणे | प्रतिनिधी :**
पुणे-बंगळुरु महामार्गावर एक खळबळजनक प्रकार घडला आहे. पुणे-बंगळुरु महामार्गावर पुण्यातल्या डॉक्टर महिलेची आत्महत्या केली आहे. कारच्या शेजारीच या डॉक्टर महिलेचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरु केला आहे. सांगलीच्या इस्लामपूर नजीक पुण्यातील एका डॉक्टर महिलेने आत्महत्या केल्याचा प्रकार घडला आहे. शुभांगी वानखडे (वय ४४) असे या डॉक्टर महिलेचे नाव आहे. शुंभांगी यांनी स्वतःच्या कारमध्ये ब्लेडने हाताचे नस कापून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पुणे-बंगळुरू महामार्गावरील विठ्ठलवाडी येथे शुभांगी वानखडे या त्यांच्या कार शेजारीच मृत अवस्थेत आढळून आल्या होत्या. घटनेची माहिती मिळताच इस्लामपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत या प्रकरणी तपास सुरू केला होता. शुभांगी वानखडे यांनी नैराश्यपोटी आत्महत्या केल्याचं प्राथमिक तपासात समोर आल्याचे सांगितलं आहे.शुभांगी वानखडे या पुण्यामध्ये एका हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग तज्ञ म्हणून काम करत होत्या. घटनेच्या दिवशी त्या पुण्यातून हॉस्पिटलला जाण्यासाठी घरातून निघाल्या. यानंतर त्या थेट कोल्हापूरच्या निपाणी पर्यंत आल्या. त्यानंतर पुन्हा पुण्याकडे जात असताना त्यांनी इस्लामपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विठ्ठलवाडी येथे पुणे बंगळूर महामार्गावर त्यांनी आपल्या कारमध्येच स्वतःच्या हाताच्या नसा ब्लेडने कापून आणि मानेवर वार करून आत्महत्या केल्याचं प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याचं इस्लामपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय हरगुडे यांनी सांगितला आहे.




## डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने पतीचा मृत्यू, गोंदियातील घटना
# दारू का पितोस म्हणून पत्नीकडून पतीला जबर मारहाण



**■बेळगाव | प्रतिनिधी:**
गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा पोलीस स्टेशन मधील हलबीटोला येथे एक खळबळजनक घटना घडली आहे. यात पती दारू का पितो म्हणून पत्नीने जाब विचारात पतीला जबर मारहाण केली. यात पतीचा मृत्यू झाल्याची घटना घडलीय. राजकुमार मेश्राम (वय ४८ वर्षे, रा. हलबीटोला,) असे मृतकाचे नाव आहे. या प्रकरणातील आरोपी पत्नी रामकला मेश्राम विरोधात सालेकसा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढे आलेल्या माहितीनुसार, मृतक राजकुमार हा घरी दारू पिवून येतो म्हणून पती पत्नीमध्ये कडाक्याचे भांडण झालं. यात तिने आरडा ओरड करत गोठ्यात असलेला लाकडी बासाचा मजबूत दांडा घेवून आपल्या पतीच्या डोक्यावर मारला. यात पती राजकुमार मेश्रामला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर राजकुमार रात्रभर त्याच अवस्थेत पडून राहिल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणात सालेकसा पोलिसांनी मृतकाची पत्नी रामकला विरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०५ अन्वये गुन्हा दाखल केला असून पत्नीला अटक करण्यात आली आहे. सध्या पोलीस निरीक्षक भूषण बुराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सालेकसा पोलीस तपास करत आहे.

## अमरावतीला स्त्री भुताने पछाडलं?
# अमरावतीत तरुणासोबत भयंकर घडलं?

**■नागपुर | प्रतिनिधी :**
आजच्या डिजिटलच्या युगात कधी काय समोर येईल हे सांगता येत नाही. सोशल मीडियावर रोज वेगवेगळे दावे करणारे व्हिडीओ,फोटो व्हायरल होत असतात. कधी एखाद्या व्यक्तीला गूढ खजिना सापडल्याचा दावा केला जातो, तर कधी एखाद्या व्यक्तीला भूत दिसल्याचा दावा करणारा व्हिडीओ समोर येतो. अशा अनेक कथांमुळे साधेभोळे नागरिक मात्र दहशतीत असतात. सध्या असाच एक दावा करणारा व्हिडीओ आणि फोटो व्हायरल होत आहेत. अमरावती शहरात एका तरुणाला स्त्री भूताने बेदम मारहाण केल्याचं म्हटल जात आहे. या दाव्यामुळे अमरावती शहरात वेगवेगळ्या चर्चांचे पेव फुटले आहे.

**नेमकी चर्चा काय केली जातेय?**

मिळालेल्या माहितीनुसार अमरावतीच्यामध्ये छत्री तलावाजवळ युवकाला स्त्री भुताने मारल्याचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर फिरतो आहे. लोकांच्या या दाव्यामुले नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे हा दावा करताना काही फोटो आणि व्हिडीओ शेअर केले जात आहेत. यातीलच एका फोटोत मारहाण झालेल्या तरुण दिसतोय. तर दुसऱ्या एका फोटोत कथित स्त्री भूत दाखवण्यात आले आहे. काही व्हिडीओंमध्ये काळोख दाखवण्यात आलाय आणि या काळोखात काही महिला घाबरून ओरडताना दिसताय. त्यामुळेच अमरावतीमध्ये सध्या भीतीचे वातावरण पसरले आहे.



### नागरिकांनी घाबरून जाऊ नये

तसेच सध्या शेअर केल्या जात असलेल्या व्हिडीओंना तसेच फोटोंना कोणताही सत्याचा आधार नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहनही अमरावती शहराचे पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी केले आहे.

**पण नेमके सत्य काय?**

अमरावतीत स्त्री भूत असल्याचा दावा केला जात असताना पोलिसांनी मात्र यामागचं सत्य सांगितलं आहे. भूत वगैरे अशा कोणत्याही गोष्टी अस्तित्त्वात नाहीत, असं अमरावतीच्या पोलिसांनी सांगितलंय. तसेच दीड वर्षांपूर्वी हीच व्हिडीओ क्लिप व्हायरल करण्यात आली होती आणि परिसरात भूत असल्याचा दावा करण्यात आला होता. आम्हाला मारहाण झाली आहे, असा दावा करणारी व्यक्ती आमच्याकडे आलेली नाही. तशी कोणी तक्रारही दिलेली नाही, असे अमरावतीच्या पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### नको ते धाडस अंगावर बेतलं, सती नदीत दुचाकीस्वार वाहून गेला

पुलावरून पाणी वाहत असताना नको ते धाडस करत वाहन पाण्यात टाकल्याने दुचाकीस्वार वाहून गेल्याची धक्कादायक घटना गडचिरोलीच्या कुरखेडा तालुक्यातील सती नदी पूलावर घडली. नशीब बलवत्तर म्हणून तेथे उपस्थित कामगार आणि पोलिसांनी त्या वाहून जाणाऱ्या इसमास वाचवण्यात यश मिळाले. अजय बाळकृष्ण रामटेके, वय ४० वर्षे, रा. श्रीराम नगर, कुरखेडा असे त्या इसमाचे नाव आहे. गडचिरोली जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे अनेक नदी नाल्यांना पूर आलाय. सती नदीच्या पूलावरूनही पाणी वाहत असताना अजय रामटेके यांनी धाडस करीत वाहन टाकले. मात्र क्षणातच ते वाहून गेले. यावेळी पुलावर बंदोबस्तासाठी असलेल्या पोलीस जवान आणि कामगारामी दोरीच्या साह्याने वाहून जाणाऱ्या वाचवण्यात यश मिळवले. यामुळे पुलावरून पाणी वाहत असताना नुसत धाडस करू नये असे आवाहन प्रशासनाने केले आहे.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# चव्हाण पेलणार का आव्हान!

विधानसभा निवडणूक निकालानंतर सात महिन्यांनी महाराष्ट्र भाजपला प्रदेशाध्यक्ष मिळाले आहेत. मंगळवारी झालेल्या भाजप राज्य परिषदेत रवींद्र चव्हाणांची प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली. भारतीय जनता पक्षात कशी लोकशाही आहे, याचाही शो या निमित्ताने करण्यात आला. रवींद्र चव्हाण यांच्याशिवाय कोणाचाही या पदासाठी अर्ज नव्हता. त्यामुळे त्यांच्या निवडीच्या घोषणेची फक्त औपचारिकता शिल्लक होती. सर्वसामान्य कार्यकर्ता प्रदेशाध्यक्ष पदापर्यंत पोहचू शकतो, हे भाजपमध्येच घडू शकते हे नितीन गडकरींसारखे नेतेही बोलून गेले. रवींद्र चव्हाण यांची कोकणावर विशेष पकड आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीआधी त्यांची प्रदेशाध्यक्षपदी झालेली निवड ही सत्तेत सोबत असलेल्या सहकाऱ्यांनाच अधिक तापदायक ठरणार का, याचीच चर्चा अधिक आहे. रवींद्र चव्हाणांची निवड एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला शह देण्यासाठीही महत्त्वाची मानली जात आहे. सर्वसमावेशक चेहरा आणि सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत थेट संपर्क ही त्यांची जमेची बाजू. त्यासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील ते नेते आहेत. मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे गडकरींच्या गोटातील की फडणवीसांच्या याची चर्चा नेहमी होत राहिली. ५४ वर्षांचे रवींद्र चव्हाण मुळचे मुंबईतील. शिक्षण मुंबईतच झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून त्यांनी सामाजिक कायार्ला सुरुवात केली. त्यांचा राजकारणातील प्रवेश कल्याण भाजपचे उपजिल्हाध्यक्ष म्हणून झाला. २००५ साली काँग्रेस उमेदवाराचा पराभव करुन कल्याण-डोंबिवली महापालिकेत त्यांनी प्रवेश केला. स्थायी समिती सभापती झाले. २००९ मध्ये डोंबिवली हा नवा विधानसभा मतदारसंघ तयार झाला. तेव्हा भाजपने चव्हाणांना पहिल्यांदा विधानसभेची संधी दिली. या निवडणुकीत त्यांनी मनसेच्या उमेदवाराला धोबीपछाड दिली. त्यानंतर रवींद्र चव्हाणांनी मागे वळून पाहिले नाही. २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग चार विधानसभा निवडणुकीत विजयश्री खेचून आणली. २०१४ मध्ये भाजप-शिवसेना युती तुटली. त्यावेळी चव्हाणांनी शिवसेनेचे दिपेश म्हात्रे यांचा (४६ हजार २२५ मतांनी) पराभव केला. २०१९ मध्ये मनसेचे मंदार हळवे यांचा (४१ हजार ३११) पराभव केला. त्यावेळी कोकण विभागातून सर्वाधिक मते मिळवणारे ते उमेदवार ठरले होते. २०२४ मध्ये त्यांनी दिपेश म्हात्रेंचा पुन्हा पराभव केला. एकीकडे राजकीय घोडदौड सुरू असतानाच संघाचे संस्कार असलेला हा नेता सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमातही समरसून गेलेला पाहायला मिळतो. डोंबिवलीवरील पकड त्यांनी उत्तरोत्तर मजबूत केली. अर्थात शिवसेना आणि मनसेला एकाच वेळी टक्कर देऊन विजयी होत आहेत. अशाच प्रदेशाध्यक्षाची भाजपला सध्या नितांत गरज होती. २०१६ साली त्यांचा पहिल्यांदा राज्य मंत्रिमंडळात समावेश झाला. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्त्वातील मंत्रिमंडळात बंदरे, माहिती आणि तंत्रज्ञान, वैद्यकीय शिक्षण आणि अन्न व नागरी पुरवठा या चार खात्यांची २०१६ ते २०१९ पर्यंत जबाबदारी सांभाळली. सोबतच रायगड आणि पालघर जिल्ह्याचे पालकमंत्रीपद त्यांच्याकडे होते. २०१९ मध्ये त्यांनी आमदारकीची हॅट्रिक केली आणि पक्षात त्यांचे महत्त्व वाढले. २०२० मध्ये महाराष्ट्र प्रदेश महामंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली. २०२२ मध्ये शिवसेनेत झालेल्या बंडानंतर एकनाथ शिंदे भाजपच्या पाठिंब्याने मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात चव्हाणांची कॅबिनेट मंत्रीपदी वर्णी लागली. यावेळी त्यांना पालघर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली. शिंदेंच्या कॅबिनेटमध्ये संधी मिळालेल्या चव्हाणांकडे सार्वजनिक बांधकाम खाते होते. रवींद्र चव्हाणांचा हा कार्यकाळ चर्चेत राहणारा ठरला. शिवसेनेतून फुटून बाहेर पडलेले आणि शिंदेसोबत असलेले ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी चव्हाणांवर आरोपांच्या फैरी सुरू केल्या. मुंबई-गोवा महामार्गावरुन दोन्ही नेत्यांनी एकमेकांवर आरोप सुरू केले. रामदास कदम यांनी चव्हाण बांधकाममंत्री म्हणून कुचकामी असल्याची टीका केली. तर चव्हाणांनीही कदमांच्या चार दशकांच्या राजकीय कारकिर्दीत कोकणासाठी काय केले, याचा हिशेब मागितला होता. यामुळे महायुती सरकारमधील धुसफूस समोर आली. शिंदेंच्या शिवसेनेला नडणारा नेता अशी त्यांची ओळख निर्माण झाली. लोकसभा निवडणुकीत श्रीकांत शिंदेंच्या उमेदवारीनंतर तर हा वाद अधिकच वाढला. तेव्हा देवेंद्र फडणवीसांना मध्यस्थी करावी लागली होती. कोकण हा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. तिथे रवींद्र चव्हाणांनी त्यांच्या पालकमंत्रीपदाच्या कार्यकाळात चंचू प्रवेश करण्यास सुरुवात केली. तर ठाणे शिंदेंच्या शिवसेनेचा गड मानला जातो. आगामी काळात मुंबईसह ठाणे आणि २९ महापालिकांची निवडणूक आहे. या सर्व पार्श्वभूमीवर रवींद्र चव्हाणांना प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. मुंबई, ठाणे आणि कोकणात भाजपला सशक्त करण्याची जाबाबदारी त्यांच्यावर असणार आहे. संघटनात्मक पातळीवर पक्षाला मजबूत करणे हाही त्यांच्या टास्कचा भाग असेल. २०२९ मध्ये भाजपने स्वबळावर राज्यात सत्तेवर येण्याचे ध्येय ठेवले आहे. तेव्हा आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने मोर्चे बांधणी, कार्यकर्त्यांना 'बळ' देणे हे त्यांच्या पुढील मुख्य आव्हान असणार आहे. राज्यात स्वबळावर सत्तेत यायचे असेल तर शिंदेंच्या शिवसेनेसोबत आगामी काळात त्यांचे संबंध किती मधूर राहतात आणि विरोधात असलेल्या शिवसेनेला ते मुंबई, ठाणे, कोकणात किती धक्के देऊ शकतात. तसेच किती काँग्रेसींना भाजपात सामावून घेतात, यावरच त्यांच्या प्रदेशाध्यक्षपदाचे मूल्यमापन होणार आहे.

# विधिमंडळ, सरकार, प्रशासनाचे नाते काय?

राजकारणी व्यक्तींना पूर्वी 'साहेब' म्हटले जाई. कै. यशवंतराव चव्हाण, कै. वसंतराव नाईक, पुढे शरद पवार यांचा उल्लेख 'साहेब' असाच होतो. विधानसभेचे माजी अध्यक्ष बॅ. शेषराव वानखेडे, बाळासाहेब भारदे यांचाही उल्लेख तसाच होई. पण राजकारणात व्यक्तिप्रेमाचा लळा (की स्तोम?) जसजसा वाढू लागला, तसे 'नाना', 'दादा', 'काका', 'भाऊ' असे शब्द वाढले. शिवसैनिक आपल्या सहकाऱ्यांचा उल्लेख 'भाई' असा करू लागले. पण त्यांच्या पक्षाचे शीर्षस्थ नेते कायम 'साहेब' असेच संबोधले जातात. हे झाले राजकारण्यांचे. अधिकाऱ्यांचा उल्लेखही कायम 'साहेब' असाच होई. ब्रिटिश काळातही ते 'साहेब' होते. आजही, उद्याही ते 'साहेब' असणार आहेत. पण त्यांच्या कामाच्या स्वरुपामुळे त्यांचा उल्लेख करताना उत्तर भारतात त्यांना 'बाबू' असे म्हटले जाते. अधिकारीवर्गाचा उल्लेख 'बाबू' असा करणे नंतर वरचेवर वाढतच गेले. महाराष्ट्रातही अनेकजण 'बाबूगिरी', 'बाबूशाही' असा उल्लेख करतात.

याचा उल्लेख करण्याचे प्रयोजन असे की, मंगळवारी विधानसभेत दोन ज्येष्ठ सदस्य नोकरशाहीवर बरसले. भाजपचे सुधीर मुनगंटीवार (प्रेमाने त्यांना 'भाऊ' म्हटले जाते) आणि शिवसेनेचे अर्जुन खोतकर यांनी विधिमंडळाच्या अधिकारी गॅलरीतील रिकाम्या खुर्च्या पाहून त्रागा, संताप व्यक्त केला. सभागृहात महत्त्वाची चर्चा सुरू असताना त्या त्या विषयांशी संबंधित विभागांचे सचिव गॅलरीत उपस्थित असू नयेत, यावरून बरीच गरमागरम चर्चा झाली. अध्यक्षांच्या आसनावर त्यावेळी चेतन तुपे हे सदस्य होते. अधिकारी बाहेरून कामकाजाचे लाईव्ह टेलिकास्ट पाहतात. इथे येत नाहीत, असा त्यांचा सूर होता.

तसे तर हा विषय फार चर्चा करण्याचा नाही. २५-३० वर्षांपूर्वीही अशा विषयांवर चर्चा करण्याचे प्रसंग आलेले नाहीत. त्यावेळी लाइव्ह टेलिकास्टची सोय नव्हती हेही तितकेच खरे. पण विधानसभा असो व विधान परिषद, या सभागृहातील अधिकारी गॅलरी, वार्ताहर गॅलरी, प्रेक्षक गॅलरी या अदृश्य समजल्या जातात. त्याचा सभागृहाच्या कामकाजाशी अधिकृत असा संबंध जोडला जात नाही. अधिकाऱ्यांनी गॅलरीत बसून चर्चा ऐकाव्यात, सभागृहाच्या भावना समजून घ्याव्यात आणि काही स्पष्टीकरण, माहिती द्यायची असल्यास एखाद्या चिठ्ठीवर सभागृहातील कर्मचाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, मंत्री यांच्याकडे माहिती पाठवावी, अशी अपेक्षा असते. मोठ्या चर्चेला उत्तर देताना मंत्र्यांना विभागाची भूमिका सांगण्यासाठी अधिकाऱ्यांकडून टिपणे काढली जातात.



राज्यघटनेच्या तीन स्तंभांपैकी कार्यपालिका म्हणजेच प्रशासन आणि विधिमंडळ यांच्यात संघर्ष होत असेल. तर ती गंभीर बाब आहे. विधिमंडळात यावर व्यापक चर्चा होणे, हे लोकशाही व्यवस्था अधिक कार्यक्षमपणे राबविण्यासाठी आवश्यक आहे.

अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे की नाही, हा विषय सरकारचा आहे. सदस्यांना संबंधित मंत्र्यांकडून उत्तरे हवी असतात. अपुरी माहिती, चुकीचे उत्तर यासाठी मंत्री जबाबदार धरले जातात, अधिकारी नाही. चुकीच्या, अपुऱ्या उत्तरांसाठी मंत्र्यांची फजिती होण्याचे प्रसंग घडले आहे. वातानुकूलीत सभागृहात त्यांचा घाम निघालेला आहे, मंत्र्यांना दिलगिरी व्यक्त करावी लागलेली आहे. अध्यक्षांकडून समज मिळालेली आहे. आणि हे होताना समोरून सदस्यांच्या अभ्यासपूर्ण आणि तडाखेबंद विचारांचा आधार मिळालेला आहे.

पूर्वी विभागाचे सचिव आवर्जून सभागृहाच्या गॅलरीत येत. हळूहळू केवळ मुख्यमंत्र्यांच्या विषयांशी संबंधित चर्चेला सचिव येऊ लागले. मागील दहा-पंधरा वर्षांचा कारभार आठवला, तर सचिवांची संख्या रोडावत गेली. असे का होऊ लागले यावर जाणकार सदस्यांनीच बोलायला हवे. त्यांचा तो अधिकार आहे. मुनगंटीवार आणि खोतकर यांनाही तो पोचतो, कारण सुधीरभाऊ १९९५पासून आणि खोतकर १९९०पासून विधानसभेवर निवडून येत आहेत. सध्या अंदाज समितीचे प्रमुख असलेले खोतकर अधून-मधून सभागृहात येत राहिले. मुनगंटीवार तर सलग येतात.

आपल्या एकूणच घसरणीचा वेग असा की, गेली काही वर्षे प्रत्येक अधिवेशनाच्या आधी संसदीय कार्य विभागाचे सचिव शासन निर्णय (जीआर) किंवा परिपत्रक प्रत्येक विभागाला पाठवतात. त्यात विधिमंडळ कामकाजाला कसे प्राधान्य द्यावे, प्रश्नोत्तराचा तास, लक्षवेधी सूचना, विभागवार चर्चा याबाबतची तयारी कशी असावी, अधिकाऱ्यांनी गॅलरीत उपस्थित राहण्याची, मुद्दे नोंदवून घेण्याची काळजी कशी घ्यावी असे तपशीलवार विवेचन , एखाद्या शाळेतील मुले सहलीला जाताना त्यांचे शिक्षक जसे सांगतात, तसे केलेले असते.

अशी वेळ का यावी आणि ती का येऊ द्यावी यावर सरकार, प्रशासन, विधानमंडळ विचार करणार आहे की नाही? आपल्या प्रगतीचा आलेख नेमका कोणत्या दिशेने वाढतोय यावर गांभीर्याने चर्चा व्हायला हवी. अधिकाऱ्यांना गॅलरीत बसावेसे वाटत नसेल तर ते का, यावर विधिमंडळाचे पीठासीन अधिकारी, सत्ताधारी व विरोधी पक्षाचे मान्यवर यांची स्वतंत्र बैठक घेऊन चर्चा करायला पाहिजे. सदस्यांच्या भाषणांबाबतही चर्चा व्हायला हवी. मूळ विषयाला धरून किती बोलले जाते, त्याबाबत व्यापक जनहिताचे कोणते मुद्दे मांडले जातात, आपापल्या मतदारसंघापुरते वा व्यक्तिगत बोलले जाते की अवघे राज्य आपल्याला ऐकत आहे, या भावनेने बोलले जाते, यावरही विचार झाला पाहिजे.

प्रशासन हे कार्यपालिका म्हणून राज्यघटनेच्या तीन स्तभांपैकी एक आहे. या प्रशासन स्तंभाचा, विधिमंडळ या स्तंभाशी संघर्ष दिसत असेल तर तो मोठा चर्चेचा विषय आहे. एकूणच कार्यपालिका या विषयावर विधिमंडळात व्यापक चर्चा झाली तर राज्याच्या हिताचेच ठरेल. पण ती करावीच असे बंधन सामान्यजन घालू शकत नाहीत. विधिमंडळाच्या विविध विषय समित्या आहेत. जशी अंदाज समिती, तशीच लोकलेखा, सार्वजनिक उपक्रम, उपविधान अशा अनेक समित्या आहेत. त्यांच्या बैठकांना अधिकारीवर्ग उपस्थित असतो. त्या बैठकांचे अनुभव काय आहेत हे समजून घेण्याचा अधिकार विधिमंडळाला असायला हवा, नव्हे तो आहेच.

अदृश्य समजल्या जाणाऱ्या अधिकारी गॅलरीचा उल्लेख करण्याचा प्रसंग येत असेल तर सरकारला तिथे काय ऐकून घ्यावे लागतेय, हे समजून घेण्यासाठी तरी अधिकारीवर्गाने तिथे यायला हवे. पण नाही गेले तरी चालते, असे त्यांनाही का बरे वाटत असावे? प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतातच. विधिमंडळात सर्व गोष्टींची खुली चर्चा व्हावी, ही अपेक्षा गैर नसावी.

लोकशाहीच्या तीन स्तभांपैकी, विधानमंडळ आणि कार्यपालिका यांचे संबंध, सौहार्दता याची चर्चा खुलेपणाने करण्याची वेळ आली आहे. ती फार काळ टाळता येणार नाही. लोकांना अधिकारीवगार्ला मिळणारे वेतन, त्यात वेतन आयोगाप्रमाणे होणारी वाढ दिसते. पण आता विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतनसुद्धा वेतनआयोगाशी निगडीत केले गेले आहे. आता जबाबदारी पुढे पुढे ढकलत फार काळ थांबता येणार नाही.

जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका येथे सर्वसाधारण बैठकीत सामान्यपणे अधिकारीवर्ग लक्ष्य ठरतो. अनेक विषयांवर थेट अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाते. तसेच आता विधानमंडळात होणार आहे का? तात्विक मुद्द्यावर बोलायचे, तर कुठेही असे होणे अपेक्षित नाही. कारण लोकशाहीत लोकांनी निवडून दिलेले लोक व्यवस्था चालवतात व प्रशासन संविधानाने आखून दिलेल्या चौकटीत लोकाभिमुख भूमिका बजावत असते. आता व्याख्या बदलून थेट अधिकाऱ्यांना जबाबदार धरायचे तर आधी मंत्र्यांची त्या त्या विभागाचे प्रमुख म्हणून या जबाबदारीतून अधिकृत सुटका करावी लागेल. हे होईल का? नाहीतरी अधिकारी फार शिरजोर झाले आहेत हे वाक्य अलीकडे सर्रास कानावर येतेच ना?

# यंदाचे अधिवेशन महायुतीसाठी आव्हानात्मक



कर्जमाफी, अवकाळी पावसामुळे शेतपिकांचे नुकसान, शक्तिपीठ महामार्ग, हुंडाबळी, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रासह देशातील २६ पर्यटकांची हत्या, पुण्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळण्याची दुर्घटना आणि शाळांमध्ये हिंदी भाषा सक्ती अशा विविध मुद्द्यांवरून विरोधक महायुती सरकारला पावसाळी अधिवेशनात घेरणार.

शेतकऱ्यांची कर्जमाफी, अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतपिकांची नुकसानभरपाई, शक्तिपीठ महामार्ग, पुण्यातील वैष्णवी हगवणे यांचा हुंडाबळी, लाडक्या बहिणींचे २१०० रुपये, पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रासह देशातील २६ पर्यटकांची हत्या, पुण्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळण्याची दुर्घटना त्यात चार जणांचा मृत्यू आणि शाळांमध्ये हिंदी भाषा सक्ती अशा विविध मुद्द्यांवरून विरोधक महायुती सरकारला ३० जूनपासून सुरू होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात घेणार यात दुमत नाही. विरोधकांचे संख्याबळ कमी असले तरी आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून विरोधक अधिवेशनात आक्रमक भूमिका मांडतील आणि महायुतीला जाब विचारणार. महायुतीतील प्रमुख नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार विरोधकांच्या टीकेला उत्तर देण्यासाठी निपुण असले, तरी विरोधकांच्या आक्रमक फटकेबाजीमुळे यंदाचे पावसाळी अधिवेशन महायुतीसाठी आव्हानात्मक ठरणार, असे एकूण चित्र आहे.

राज्यात महायुती सत्तेत आल्यानंतरचे हे तिसरे अधिवेशन. डिसेंबर २०२४ मध्ये नागपूर येथील हिवाळी अधिवेशन, फेब्रुवारी २०२५मध्ये मुंबईत अर्थसंकल्पीय अधिवेशन आणि आता तिसरे पावसाळी अधिवेशन मुंबईत. विधी मंडळाच्या सभागृहात व परिषदेत राज्यातील १३ कोटी जनतेचे प्रश्न मांडत त्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळवणे हा अधिवेशनाच्या मुख्य उद्देश; मात्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला जनतेचा मिळालेला कौल महाविकास आघाडीच्या नेत्यांना पटलेला नाही. त्यामुळे महायुतीचे एखादे प्रकरण बाहेर पडताच मविआ नेते महायुतीवर तुटून पडतात. महायुतीला घेरण्याची एकही संधी मविआ नेते सोडत नाहीत. सत्तेत असो वा नसो, राजकारणी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्याची संधी गमावत नाहीत. त्यामुळे पावसाळी अधिवेशनात ही सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर हवा तसा आवाज न उठवता एकमेकांची उणीधुणी काढण्यातच सर्वपक्षीय नेतेमंडळी धन्यता मानतील. अवकाळी पावसामुळे शेतपिकाचे नुकसान, कर्जबाजारी झाल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या, विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचे महायुतीचे आश्वासन, समृद्धी महामार्गावर पडलेले खड्डे, शेतकऱ्यांच्या विरोधानंतर शक्तिपीठ महामागार्चा अट्टाहास, मंत्र्यांची वादग्रस्त विधाने, वाढवण बंदराला स्थानिकांचा विरोध तरी प्रकल्प रेटण्याचा डाव, संसद व विधिमंडळ सदस्यांना चांदीच्या ताटात साडेचार हजार रुपयांचे जेवण आणि गाजत असलेला हिंदी भाषा शिकवण्याचा निर्णय या सगळ्या मुद्द्यांचे आयते कोलीत महाविकास आघाडीच्या नेत्यांना मिळाले आहे. राज्याच्या तिजोरीत खडखडाट तरी कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पांची घोषणा या सगळ्या मुद्द्यावरून विरोधक महायुतीच्या नेत्यांना घेरण्याचा जोरदार प्रयत्न करणार.

शेतमालाला हमीभाव मिळत नाही, शेतकऱ्यांची कर्जमाफी ही फसवणूक, शेतकऱ्यांचा प्रश्न पेटत असताना बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या, परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत पोलिसांच्या मारहाणीत झालेला मृत्यू, हुंड्यासाठी पुण्यातील वैष्णवी हगवणे यांचा हुंडाबळी, पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने वैष्णवी हगवणे यांच्यावर उपचारास नकार, सिमेंट काँक्रीटच्या रस्ते कामांत घोटाळा, सत्ताधारी पक्षातील मंत्र्यांची वादग्रस्त विधाने यंदाच्या पावसाळी अधिवेशनात चर्चेचा विषय ठरणार आहे. हल्लाबोल, आरोप-प्रत्यारोप, टीका, भ्रष्ट कारभाराची पोलखोल एकूणच महायुतीच्या कारभाराची पोलखोल करत पावसाळी अधिवेशनाला सोमवार, ३० जूनपासून सुरुवात होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचे तिसरे पावसाळी अधिवेशन; मात्र, अधिवेशनाच्या तोंडावर रायगड, नाशिक जिल्हा पालकमंत्रिपदाचा वाद आणि रखडलेल्या नियुक्त्या, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्री यांना अद्याप खासगी सचिव, विशेष कार्य अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली नाही. भाजपचे नेते बबनराव लोणीकर यांनी केलेले वादग्रस्त विधान अन् नंतर व्यक्त केलेली दिलगिरी, मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांप्रती केलेले वादग्रस्त विधान, अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शिंदे सेनेचा निधी वाटपात दुजाभाव यावरून महायुतीतील बेबनाव समोर आला आहे. महायुतीतील या तणावाचा फायदा उठवत राज्यातील विविध प्रश्नांवरून महाविकास आघाडीने सरकारला घेरण्याची तयारी मविआ नेत्यांनी केली आहे. आरोप-प्रत्यारोप टीकाटिप्पणी करत यंदाचे अधिवेशन राज्यातील विविध प्रश्नांवरून गाजणार, हेही तितकेच खरे.

जनतेचे प्रश्न जैसे थे!

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने ह्यमुख्यमंत्री माझी लाडकी बहीणह्ण योजना सुरू केली. प्रत्येक महिलेला दर महिना दीड हजार देण्याचा निर्णय घेतला. शिवाय दीड हजार रुपयांवरून २ हजार १०० रुपये करण्याचे आश्वासन दिले; मात्र, निवडणुका होताच राज्य सरकारने या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांची छाननी सुरू करून अपात्र बहिणींना योजनेतून वगळण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत ९ लाखांहून अधिक बहिणी अपात्र ठरल्या आहेत. विरोधकांनी यावरून सरकारवर टीका केली. हा मुद्दा आक्रमकपणे विरोधक अधिवेशनात लावून धरत महायुतीची कोंडी करणार, त्यामुळे यंदाचे पावसाळी अधिवेशन आरोप-प्रत्यारोपात गुंडाळले जाणार अन् सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जैसे थे राहणार.

# तरी सजग राहावे लागेल!



पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावरच प्रचंड बहुमताच्या सरकारला ह्यपहिलीपासून हिंदी सक्तीचाह्ण निर्णय जनरेट्यासमोर मागे घ्यावा लागला; मात्र एकीकडे माघार तर दुसरीकडे जनसुरक्षा विधेयक किंवा शक्तिपीठ महामार्ग यासारखे घातक निर्णय रेटण्याचा प्रयत्न सरकार पावसाळी अधिवेशनात करेल. रस्त्यावरच्या आणि वेळ पडल्यास न्यायालयीन लढाईस जनतेने सज्ज रहावे!

महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावरच विरोधकांसोबतच्या चहापानाआधी सरकारला पहिल्या इयत्तेपासून हिंदी भाषेच्या सक्तीचे अध्यादेश मागे घ्यावे लागले. मागील विधानसभा निवडणुकीत केंद्रातील सत्तेचा गैरवापर करत पाशवी बहुमताने सत्तेवर आलेल्या महायुती सरकारला पुन्हा एकदा जनरेट्यासमोर सपशेल माघार घ्यावी लागली. विरोधी पक्षांबरोबरीनेच नव्हे तर त्यांच्याही पुढे जात सामान्य मराठी भाषिक जनता, लोकशाहीवादी संस्था-संघटना व कणा असलेले साहित्यिक-कलाकार यांच्या पुढाकारामुळे मायबोलीच्या स्वाभिमानाचा डंका सर्वत्र वाजवण्यात महाराष्ट्र जनतेला यश मिळाल्याचे हे द्योतक आहे. मात्र हे सरकार अत्यंत धूर्त, धोरणी व वेळप्रसंगी कावेबाज पद्धतीने वागणाऱ्यांच्या हातात आहे, हे लक्षात घेता हिंदीसक्ती मागे घेत त्या बदल्यात अन्य काही चुकीचे निर्णय या अधिवेशनात करवून घेण्याचा घाट सरकारने घातला आहे की काय, अशी शंका घेण्यास जागा दिसते आहे.

मागील विधानसभा अधिवेशनात ज्या विधेयकाचा पुनरुच्चार झाला, जे विधेयक या आधीच्या विधानसभेच्या शेवटच्या अधिवेशनात रेटण्याचा त्यावेळच्या शिंदे सरकारमधील गृहमंत्री फडणवीसांचा प्रयत्न विरोधकांनी हाणून पाडला. पुन्हा सत्तेवर आलेल्या महायुती सरकारच्या फडणवीस सरकारने पुन्हा एकदा तेच जनसुरक्षा विधेयक आणले. विरोधकांपाशी संख्याबळ नसल्याने ते विधेयक जरी रोखता आले नसले तरी ते विधिमंडळाच्या संयुक्त समितीकडे पाठवण्याचा निर्णय करून घेण्यात विरोधकांना यश मिळाले. विधेयकाबाबत जनतेच्या हरकती मागवण्याची सूचना प्रकाशित झाल्यावर राज्यातील लोकशाहीप्रेमी व संविधानवादी विरोधी राजकीय पक्ष, शेकडो संघटना, जनआंदोलने, संस्था व संवेदनशील व्यक्तींनी समितीकडे हरकतींचा पाऊस पाडला. सरकारनेच जाहीर केल्याप्रमाणे विधेयकावर रेकॉर्ड ब्रेकिंग १३ हजार सूचना आल्या. इतके होऊनही हे विधेयक संमत करण्याचा सरकारचा हेका काही कमी झालेला नाही.

वर संविधानविरोधी आग्रह संविधानिकच असल्याचा कांगावा करण्यात सत्ताधारी भाजप हुशार आहे. जनसुरक्षा विधेयकाचीही हीच कथा आहे. जनसुरक्षेचे जरी नाव असले तरी वास्तवात सरकारने कितीही गैरसंविधानिक वा जनविरोधी व अन्यायकारक वर्तन केले तरी त्या विरोधात जनआंदोलन उभे राहू नये ही दक्षता म्हणून हे 'सत्ताधारी सुरक्षा विधेयक' आणले जात आहे. ज्या मोजक्या भाजपशासित राज्यांमध्ये अशाप्रकारचे कायदे करण्यात आले आहेत तिथे विरोधकांची मुस्कटदाबी सुरू आहे. विधिमंडळाच्या संयुक्त समितीकडे विधेयकावर जाहीर व खुली जनसुनवाई घेण्याची आग्रही सूचना हजारोंच्या संख्येने करण्यात आली; मात्र खुलेपणा, व्यापक चर्चा व लोकशाही संकेत यांचं केवळ वावडंच नव्हे, तर प्रचंड भीती असणाऱ्या या सरकारने या जनसहभागाच्या न्यायसंगत मागणीलाही वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

वर कडव्या डाव्या विचारांच्या संघटनांचा प्रभावी प्रतिबंध करण्यासाठी हे विधेयक आणले आहे, असा कांगावाही केलाय. साऱ्या जगाला हे ठाऊक आहे की समाजातील वंचित, पीडित, दुर्लक्षित, शोषित घटकांच्या न्याय्य मागण्यांकडे लक्ष वेधण्याचे काम डाव्या व समाजवादी संघटना करत असतात. हे विधेयक आपल्या बहुमताच्या जोरावर रेटल्यानंतर, सरकारच्या विरोधात साधा मोर्चा काढणेही दूर, नुसते न्याय सुसंगत व सरकारच्या विसंगत वर्तणुकीबाबत प्रश्न विचारले, तरी संबंधितांना विना जामीन अटकेत टाकण्याचा अनिर्बंध अधिकार सरकारला मिळणार आहे.

अशावेळी या अन्यायाविरुद्ध जनतेचा आवाजही उठू न देण्याची तजवीज या विधेयकाद्वारे साधलेली आहे. हरकती, सूचना, विरोध यांचा ढीग रचला तरी तो बेदखल करत हा कायदा या अधिवेशनात मांडण्याची पूर्ण तयारी सरकारने केलेली आहे. अशावेळी, या कायद्याच्या गैरसंविधानिक व गैरलोकतांत्रिक असण्याच्या मुद्द्यावरून, लोकशाहीची चाड असणाऱ्या जनतेला लढाई जारी ठेवावी लागणार आहे. या कायद्याच्या वैधतेला न्यायालयात आव्हान द्यावे लागणार आहे.


राज्य सरकारने असाच दुसरा एक विघातक डाव टाकला आहे, शक्तिपीठ महामार्गाचा! ८० हजार करोड रुपयांच्या या प्रकल्पाद्वारे नागपूर ते गोवा असा सहा पदरी महामार्ग टाकण्याचे नियोजन आहे. या महामार्गाची आखणी करताना राज्यातील महत्त्वाची हिंदूधर्मीय १८ तीर्थक्षेत्रे जोडण्यातून धार्मिक पर्यटनाला बळ देण्याचा प्रयत्न आहे. मागील लोकसभा निवडणुकीत या प्रकल्पाच्या क्षेत्रातील बहुतेक लोकसभा जागांवर महायुतीला सपशेल हार पत्करावी लागल्यानंतर हा प्रकल्प थंड पेटाऱ्यात बंद करून ठेवण्याची धूर्त चाल सरकारने खेळली. आता तो पुन्हा पुढे रेटण्याचा घाट घालण्यात आला आहे. मागच्याच आठवड्यात राज्य मंत्रिमंडळाने सदर प्रकल्पाच्या आखणी व जमीन अधिग्रहणासाठी २०,७८७ करोड रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी १२ हजार करोड रुपये गृहनिर्माण व शहरविकास महामंडळाकडून उभे करण्यात आले आहेत. एवढा महाकाय प्रकल्प संपूर्णपणे एकाच कंत्राटदाराला देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे साडेआठ हजार हेक्टरहून अधिक जमीन लागणार असून त्यापैकी सुमारे आठ हजार हेक्टरहून अधिक जमीन खासगी मालकीची आहे. या खासगी मालक शेतकऱ्यांना आपली उपजाव व दरवर्षी नगदी पिके देणारी जमीन हातातून जाऊ देण्यास ठाम विरोध आहे. या महामार्गाबाबत अजून एका अडचणीच्या मुद्द्याकडे टीकाकार लक्ष वेधत आहेत. नागपूर-रत्नागिरी महामार्ग अलीकडेच विस्तारण्यात आलेला असताना, पुन्हा या महामार्गाचा घाट घालणे निरर्थक आहे.

या महामार्गासमोरची सर्वात बिकट वाट असणार आहे ती या महामार्गासाठीचा अव्वाच्या सव्वा आर्थिक भार उचलण्यासाठी, राज्य सरकार सक्षम आहे का? राज्याच्या अर्थखात्याने या संदर्भात आधीच आपले हात वर करत या प्रकल्पात गंभीर वित्तीय जोखीम असल्याचा अहवाल दिला आहे. या प्रकल्पासाठी बाजारात ६.७५ टक्के दराने बॉन्ड्सच्या माध्यमातून निधी उभारणी शक्य असताना, यासाठी ८.७५ टक्के दराने कर्ज घेण्याचा प्रस्तावही वादाच्या भोवऱ्यात सापडलेला आहे. यामुळे राज्याची वित्तीय तूट चार टक्क्यांपेक्षा अधिकने वाढून राज्यावरील कर्ज व राज्याचे एकत्रित उत्पादन यांचे प्रमाण वित्तीय जबाबदारी व अंदाजपत्रक व्यवस्थापन कायद्याप्रमाणे २५ टक्क्यांच्या धोक्याच्या पातळीपार जाईल, असा इशारा अहवालात पुढे दिलेला आहे. राज्याच्या निकडीच्या प्रकल्पांना प्राधान्य देणे गरजेचे असून, अशाप्रकारचे प्रकल्प रेटत राहिले तर राज्याच्या आवश्यक प्रकल्पांसाठी व सरकारची प्राथमिक जबाबदारी असलेल्या कामांसाठी खर्च करायला सरकारकडे दमडीही शिल्लक राहणार नाही! 'कॉर्पोरेट मालामाल व सामान्य जनता कफल्लक' व त्याविरुद्ध लढणाऱ्यांवर नाहक 'जनसुरक्षा' असे घडू न देण्यासाठी, जनतेस सजग रहावे लागेल!

## स्पेशल पुदिना राईस

**साहित्य :** २ वाटी तांदूळ, २ वाटी पुदिन्याचे पाने निवडून व धुऊन, फोडणीसाठी तमालपत्र, जिरे, पाच ते सहा लसूण पाकळ्या, अंदाजे मीठ, लाल मिरची फोडणीसाठी.

**कृती :** पुदिना व लसूण पेस्ट बनवून घ्या. तांदळाचा मोकळा भात शिजवून



थंड होऊ द्या. पुलाव मसाला लहान १ चमचा, गरम पॅनमध्ये तेल, जिरे, तमालपत्र व मिरची घालून फोडणी द्या. त्यावर वाटलेला पुदिना घाला व परत पुलाव मसाला घाला. चांगले परतून शिजवलेला भात घाला. मीठ घाला, परतून वाफ येऊ द्या. खोबऱ्याचा किस व पुदिना पाने लावून सजवा व खायला वाढा. यामध्ये मिक्स पालक थोडी वाफवून व वाटून आपण घालू शकता.

## शाम्पूच्या वापरामुळे केसगळतीची समस्या वाढते का?

**कधीकधी अचानक केस खूप गळत असल्याचे तुमच्या लक्षात येते.केस गळण्याचे कारण शोधताना मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वसाधारणपणे आपण रोज केस स्वच्छ धुण्यासाठी शाम्पूचा वापर करतो. त्यामुळे आपण वापरत असलेल्या शाम्पूमुळे तर केस गळत नाहीत ना? किंवा कोणता शाम्पू आपल्या केसांसाठी योग्य असू शकतो? हे प्रश्न आपल्याला पडू शकतात.**



केस गळणे ही अनेकांना भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. मात्र केस गळण्याची कारणे प्रत्येक व्यक्तीमध्ये निरनिराळी असू शकतात. डॉ. अपूर्वा शाह यांनी त्यांच्या 'हॅव अ ग्रेट हेअर डे' या पुस्तकामध्ये शाम्पू केल्यामुळे केस गळत नाहीत किंवा तेलांमुळे केसांच्या त्वचेतील मुळे बंद होत नाहीत, असे मत मांडले आहे. त्याचप्रमाणे हेअर एक्सपर्ट जावेद हबीब यांनी देखील त्यांच्या 'हेअर योगा' या पुस्तकामध्ये शाम्पूच्या वापरामुळे केस गळत नाहीत, या सत्याचा उलगडा केला आहे.

अयोग्य शाम्पू वापरल्यामुळे मात्र तुमच्या केसांची मुळे नक्कीच कमजोर होऊ शकतात. त्यामुळे बरेच दिवस तुमचे केस गळत राहतात व केसांचे खूप नुकसान होते. यासाठी तुमच्या केसांच्या प्रकारानुसार योग्य शाम्पूचा वापर करणे गरजेचे आहे.

### योग्य शाम्पू कसा निवडाल?

तुमच्या केसांचा प्रकार ओळखून योग्य शाम्पूची निवड करा. बाजारात अनेक ब्रॅण्डचे शाम्पू उपलब्ध असले तरी त्यातून तुमच्यासाठी योग्य प्रकारच्याच शाम्पूची निवड करा. त्याचप्रमाणे दर ४ ते ५ आठवड्यांनी तुमच्या शाम्पूचा ब्रॅण्ड बदला. सतत एकाच ब्रॅण्डचा शाम्पू वापरल्यामुळे तुमच्या केसांमधील त्वचेवर त्याचा दुष्परिणाम होतो व तुम्हाला हवा तसा योग्य बदल दिसून येत नाहीत.



**योग्य शाम्पूची निवड करण्यासाठी आधी तुमच्या केसांचा प्रकार ओळखा –**

- **ऑईली हेअर –** काही दिवस केसांमधील त्वचा तेलकट असते, पण केसांची शेवटची टोके कोरडी असतात.
- **ड्राय हेअर –** केस खरखरीत असतात, जे लवकर गुंततात व कुरळे किंवा फ्रिजी असतात.
- **नॉर्मल हेअर –** केसांचा पोत अति कोरडा अथवा अति तेलकटही नसतो.
- **डॅमेज हेअर –** या केसांमध्ये कोंडा किंवा केस दुभंगण्याची (स्प्लीट एण्ड) समस्या असते.
- **लीम्प हेअर –** केस सपाट असतात, ज्यांचा व्हॉल्युम जास्त नसतो किंवा केस फुललेले नसतात.

## अ‍ॅल्युमिनियम फॉईलमध्ये पदार्थ का शिजवू

**जर** तुम्ही दररोज जेवणासाठी अ‍ॅल्युमिनियम फॉईलचा वापर करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे.

नुकत्याच करण्यात आलेल्या संशोधनातून असे समोर आले आहे की अ‍ॅल्युमिनियम फॉईलमध्ये शिजवलेले अथवा गुंडाळलेले पदार्थ खाल्ल्याने शरीरावर परिणाम होतो.

जेव्हा अ‍ॅल्युमिनियम फॉईलमध्ये अन्न शिजवले जाते, त्यावेळी मोठ्या प्रमाणात अ‍ॅल्युमिनियम अन्नात मिसळते आणि हे अन्न खाल्ल्याने ते शरीरात जाते. यामुळे हाडांचे आजार तसेच ब्रेन सेल्सची वाढ कमी होण्याची शक्यता असते.



## आवळा सरबत प्या, हे १० आजार टाळा

**आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी आवळा उत्तम आहे. आवळा सरबत घेतल्याने आपल्याला अनेक फायदे होतात. आपले आरोग्य चांगले राहते. आयुष्य वाढण्यास मदत होते. आयुर्वेदातही आवळ्याला अधिक महत्त्व देण्यात आले आहे. आवळा सरबतात मध मिसळले तर अधिक चांगले. तसेच आवळा ज्यूसमुळे महिलांच्या पाळीची समस्या दूर होण्यास मदत होते.**



- आवळा ज्यूस आणि मध एकत्र करून प्यायल्याने दम्याचा प्रभाव कमी होतो.
- रक्त शुद्ध करण्यासाठी आवळा सरबत आणि मध खूप गुणकारी आहे.
- आवळा सरबत नियमित घेतल्यास कोलेस्ट्रॉल कमी होते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका टळण्यास मदत होते.
- आवळा खाण्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. कारण मेटाबॉलिजम व्यवस्थित होऊन वजन कमी होते.
- आवळा हा पाचक आहे. त्यामुळे पचन व्यवस्था व्यवस्थित राहते.
- आवळा सरबत प्यायल्याने चेहऱ्याला ग्लो येतो. तसेच त्वचारोग दूर होण्यास मदत होते.
- लघवीचा ज्यांना त्रास आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. सरबत प्यायल्याने लघवीसंबंधीचे आजार दूर होतात.
- ज्यांना किडनी स्टोनचा आजार आहे, त्यांच्यासाठी आवळा सरबत चांगले. मूतखड्याचा आजार दूर होण्यास मदत होते.
- आवळ्यामुळे मधुमेह (Disbetes) नियंत्रणात राहण्यास मदत होते.
- सतत तोंड येत असेल तर आवळा सरबत प्यायल्याने ही समस्या दूर होते. तसेच डोळ्यांची शक्ती वाढण्यास मदत होते.

## फोनमध्येच भारी फोटो कसे काढाल? 'या' सोप्या टीप्स करा फॉलो

**आजकाल आपण कुठेही फिरायला गेलो तर तिथे सर्वात जास्त कोणतं काम करत असू तर ते फोटोग्राफी. म्हणजे प्रत्येक गोष्टीचे फोटो काढून ते सोशल मीडियावर आपण अपलोड करतच असतो. त्यात आता ते दिवस गेले जेव्हा लोक त्यांच्या आठवणी टिपण्यासाठी अर्थात फोटो काढण्यासठी मोठमोठे कॅमेरे वापरत होते. आता यासाठी बहुतेक जण मोबाईल फोनच वापरतात. तसेच, स्मार्टफोन कॅमेरे देखील दिवसेंदिवस सुधारत असताना, त्यापैकी बरेच जण जवळजवळ डीएसएलआरसारखे फोटो देतात.तर आज आम्ही तुम्हाला मोबाईल फोटोग्राफीच्या अशाच काही टीप्स आणि युक्त्या सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही स्वस्त स्मार्टफोनमध्येही कॅमेऱ्यासारखे भारी फोटो काढू शकता.**

**स्मार्टफोनचा कॅमेरा कसा आहे ते आधी समजून घ्या**

स्मार्टफोन वापरून चांगले फोटो कॅप्चर करण्यासाठी सर्वात आधी तुम्हाला तुमच्या फोनचा कॅमेरा कसा आहे म्हणजेच त्याची क्षमता किती आहे ते जाणून घेणं गरजेचं आहे. कारण फोनचं कॅमेरा सेटअप जसं असेल त्यानुसारच फोटो येणार आहेत. पण आम्ही सांगणाऱ्या टीप्समुळे तुम्ही तुमच्या फोनच्या कॅमेऱ्याचा पुरेपुर वापर करून फोटो क्लिक करू शकता. आजकाल बहुतेक आधुनिक फोन अनेक लेन्स सेटअपसह येतात जे वापरकर्त्यांना अल्ट्रा-वाइड अँगल लेन्स, टेलीफोटो लेन्स, डेडिकेटेड पोर्ट्रेट लेन्स, मॅक्रो लेन्स हे सर्व ऑफर करतात. या सर्वांच्या मदतीने तर फोटोज आणखीच भारी येतात.

**फोटो काढताना फ्रेमवर खास लक्ष द्या**

तुम्ही कोणत्याही वस्तूचा किंवा व्यक्तीचा फोटो घेत असाल तर तो पूर्णपणे फ्रेममध्ये योग्यरीत्या असेल हे लक्षात ठेवा. म्हणजेच ऑब्जेक्ट फ्रेममध्ये चांगला आला पाहिजे आणि अंतरही अधिक नसावं. तसंच कॅमेऱ्याची उंची योग्यरीत्या सेट करून परफेक्ट फ्रेममध्ये फोटो काढावा.

**तुमची लेन्स स्वच्छ करा**

ही एक अत्यंत सोपी ट्रिक असली तरी नक्कीच प्रभावी अशी ट्रिक आहे. कारण स्मार्टफोनच्या कॅमेरा लेन्स दिसतात, त्याहूनही अधिक घाण असतात. त्यामुळे त्या पूर्णपणे स्वच्छ केल्याने तुम्हाला चांगले आणि डिटेल्ड फोटो मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे फोटो काढण्यापूर्वी स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याची लेन्स नीट साफ करावी. कायमच लेन्सची काळजी घेणं फायद्याचं आहे.

**दोन्ही हात वापरा**

चांगला फोटो काढण्यासाठी नेहमी दोन हात वापरा, जेणेकरून तुमची फोनवरील पकड चांगली होईल आणि तुम्ही ऑब्जेक्ट आरामात कॅप्चर करू शकता. फोनवरील पकड चांगली असल्याने फोटो घेताना फोन हलणार नाही, ज्यामुळे फोटोही ब्लर किंवा चुकीच्या अँगल, फ्रेममध्ये येणार नाही. त्यामुळे दोन्ही हातांचा वापर करून फोटो काढणे, ही एक भारी ट्रिक आहे.

**अतिरिक्त प्रॉडक्ट्स वापरा**

डीएसएलआर कॅमेऱ्यांप्रमाणे, फोनसाठीही अतिरिक्त प्रॉडक्ट्स उपलब्ध आहेत. जसं की, ट्रायपॉड, रिंग लाइट आणि अतिरिक्त लेन्स अशा विविध प्रॉडक्ट्सचा शक्य असल्यास वापर करावा. या सर्व उपकरणांच्या मदतीने फोटो अधिक भारी येतील. ट्रायपॉडने फोटो स्थिर येतील. रिंग लाईट प्रकाश अ‍ॅडजेस्ट करेल.



**झूमचा योग्य वापर**

फोटो घेण्यासाठी झूम या फीचरचा वापर योग्यरीत्या आणि जपून वापरा. कारण अधिक झूम केल्याने फोटोची क्लीऑरिटी खराब होते. त्यामुळे आवश्यक आणि शक्य असल्यास फोटो घेत असलेल्या ऑब्जेक्टच्या जवळ जा. अधिक झूममुळे फोटोचे रिझोल्युशन खराब होऊ लागते आणि स्वस्त फोनमध्ये डिजिटल झूम फारसे चांगले नसते. तसेच स्मार्टफोनमध्ये उपलब्ध असलेले वेगवेगळे मोड वापरा जेणेकरून फोटो अधिक चांगले येतील. मोबाईल फोनमध्ये पोर्ट्रेट, नाईट, प्रो आणि स्लो-मो असे अनेक पर्याय आहेत, ज्याच्या मदतीने तुम्ही चांगला फोटो काढू शकता.

**योग्य फोकसही महत्त्वाचा**

फ्रेमिंग ही देखील महत्त्वाची गोष्ट आहे. हे आम्ही वरच सांगितलं. फोटो काढताना ऑब्जेक्टला योग्य ठिकाणी ठेवणं महत्त्वाचं आहे. तसंच फोकसही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कारण फोटो काढताना फोकस योग्यरीत्या केल्यावर ऑब्जेक्टचा फोटो अधिक भारी आणि क्लीअर येईल. फ्रेममधून अनावश्यक वस्तू काढून टाकण्यासह फोकसिंग ही एक अत्यंत उपयोगी टीप आहे.

**एचडीआर मोडचा वापर**

हाय डायनॅमिक रेंज म्हणजेच एचडीआर या मोडच्या मदतीने तुम्ही भारी भारी दर्जाचे फोटो क्लिक करू शकता. म्हणजेच तुम्ही एखादा मोठा फोटो क्लिक करत असाल तर अशा वेळी तुम्ही एचडीआर वापरू शकता. यासह, तुम्हाला तुमच्या फोटोमध्ये बरेच तपशील पाहायला मिळतील. एचडीआर एकाधिक एक्सपोजर कॅप्चर करते आणि फोटोच्या प्रकाश आणि गडद भागांमध्ये चांगले संतुलन राखते. एचडीआरमध्ये पार्क, इमारत, मंदिर किंवा मोठ्या वस्तूचा फोटो क्लिक करणे एक चांगला पर्याय आहे.

## उच्च रक्तदाब नियंत्रणासाठी सोप्या टीप्स



**संशोधनात** असे आढळून आले आहे की, दहामधून सात तरुणांना ब्लडप्रेशर जास्त असल्यामुळे हार्ट अ‍ॅटॅक किंवा स्ट्रोक येण्याची शक्यता जास्त असते. झोप कमी होणे, स्ट्रेस, डिप्रेशन, जास्त मीठ असलेले फास्ट फूड आणि डेस्क जॉब ही याची मुख्य कारणे आहेत. म्हणून...

- आठवड्यातून ३-४ दिवस कमीत कमी २० मिनिटे जॉगिंग करावी. जॉगिंग केल्याने ऑक्सिजन घेण्याच्या प्रक्रियेत सुधारणा होते आणि ब्लडप्रेशर नियंत्रित राहतो.
- रोज कमीत कमी ३० मिनिटांचे ब्रिस्क वॉक करावे.
- एरोबिक केल्याने हाय ब्लडप्रेशर कमी होते.
- तणावरहित राहण्यासाठी प्राणायाम, कपालभाती करावे.

## चमकदार त्वचेसाठी हे स्क्रब वापरून बघा

**आपल्या चेहऱ्यावरील चमक हळूहळू कमी होत आहे, तर काळजी करू नका. आम्ही आपल्याला काही घरगुती स्क्रबबद्दल सांगत आहोत ज्यांना वापरून आपण आपल्या चेहऱ्यावरील चमक परत मिळवू शकता. चला तर मग वेळ न गमावता जाणून घेऊया की, आपण घरगुती स्क्रब कसा तयार करू शकता...**

**साखर आणि लिंबू –** एक चमचा साखर घेऊन त्यामध्ये अर्धा चमचा लिंबाचा रस मिसळा. आता हळुवार हाताने याला आपल्या चेहऱ्यावर लावा आणि काही वेळ स्क्रब करून आपला चेहरा स्वच्छ धुवा.

**संत्र्याच्या सालीचे स्क्रब –** संत्र्याची साल आपल्या त्वचेला तजेलपणा आणण्यासाठी उपयुक्त आहे. यासाठी आपल्याला संत्र्याच्या सालीला वाळवून वाटून भुकटी करायची आहे. या भुकटीमध्ये थोडेसे कच्चे दूध मिसळून आपण चेहऱ्यावर लावू शकता. संत्र्याच्या सालाची भुकटी किंवा पावडर चांगले स्क्रब म्हणून काम करतं.

**तांदळाच्या पिठाचे स्क्रब –** तांदळाचे पीठ आणि दही सम प्रमाणात मिसळून घ्या. आता हे चेहऱ्यावर लावून हळुवार हाताने मालिश करा आणि काही वेळ तसेच ठेवून नंतर स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या.

**बेकिंग सोडा स्क्रब –** घरच्या घरी आपला चेहरा उजळवायचा असल्यास २ मोठे चमचे बेकिंग सोडा, १ लहान चमचा दालचिनी पूड, अर्धा लिंबाचा रस आणि मध मिसळा. या पेस्टला आपल्या त्वचेवर ५ मिनिटे लावा. लक्षात ठेवा की या पेस्टचा वापर आठवड्यातून दोन वेळापेक्षा जास्त करू नये.



## पेरूची पानेदेखील उपयुक्त असतात, नक्की वाचा याचे फायदे



पेरू औषधी गुणधर्मांने समृद्ध आहे. याच्या सेवनाने बरेच आरोग्यदायी फायदे मिळतात. उलट्या रोखण्यासाठी पेरू फायदेशीर आहे तसेच हृदयरोगापासूनदेखील बचाव होतो. तसे तर हे भारतात मिळणारे एक साधे फळ आहे, ज्याचे प्राचीन संस्कृत नाव अमृत किंवा अमृत फळ आहे. वाराणसीमध्ये याला लोक अमृत नावानेच संबोधित करतात. पेरूप्रमाणेच त्याची पानेदेखील खूप उपयुक्त असतात. यामध्ये अँटी ऑक्सिडन्ट, अँटी बॅक्टेरियल आणि अँटी इन्फ्लमेन्टरी गुणधर्म असतात, जे आपले अनेक आजारांपासून संरक्षण करतात. चला जाणून घेऊया पेरूच्या पानाचे फायदे.

पोटदुखी आणि उलट्यामध्ये आराम देतो : पेरूच्या पानात अँटी बॅक्टेरियल गुणधर्म असतात, याच्या पानाच्या पाण्याचे सेवन केल्याने आपल्या पोटाचे दुखणे दूर होऊ शकते. तसेच उलट्यापासून देखील आराम मिळतो. यासाठी पेरूच्या ५-६ पानांना १० मिनिटे उकळवून घ्या आणि नंतर गाळून त्याचे पाणी प्या.

सांधेदुखीचा त्रास दूर होतो : सांधेदुखीमध्येदेखील पेरूची पाने फायदेशीर आहेत. यासाठी आपण पेरूची पाने वाटून त्याचा लेप बनवा आणि त्या लेपाला सांध्यावर लावा, यामुळे आपल्याला वेदनेपासून आराम मिळेल.

मधुमेहातदेखील फायदेशीर : पेरूची पाने पाण्यात टाकून प्यायल्याने हे मधुमेहासाठी फायदेशीर मानले जाते. वास्तविक हे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करतं. याशिवाय हे शरीरातील जटिल स्टार्च साखरेमध्ये बदलण्यापासून रोखते, ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

दातदुखी, हिरड्यांची सूज कमी करते : पेरूच्या पानाचे पाणी दात दुखणे, हिरड्यांची सूज आणि तोंड येण्यापासून आराम देण्याचे काम करते. यासाठी पाने उकळवून त्या पाण्याने गुळण्या करा. असे केल्यास आपल्याला आराम मिळेल.

**बद्धकोष्ठता आणि गॅसच्या त्रासापासून मुक्ती मिळवण्यासाठी लसूण एक चमत्कारी औषध ठरेल. आयुर्वेदात लसूण हे चमत्कारिक गुणधर्म असलेले औषध म्हणून वर्णिले आहे, याचे बरेच फायदे आहेत. हे फक्त जेवण्याची चवच वाढवत नाही, तर शरीरास निरोगी ठेवण्यासदेखील मदत करते. याच कारणामुळे बऱ्याच घरगुती उपचारांमध्ये लसणाचा वापर केला जातो.**

## उपाशीपोटी लसूण खाण्याचे फायदे



**वास्तविक** लसणामध्ये अनेक प्रकारच्या पोषक घटकांचा समावेश आहे. यामध्ये कॅल्शियम ते तांबे, पोटॅशियम, फॉस्फरस, आयर्न आणि व्हिटॅमिन ई १ इत्यादींचा समावेश आहे. आपण लसणाचा वापर कोणत्याही प्रकारे करू शकतो. ते फायदेशीर आहेच; पण उपाशीपोटी खाल्ल्याने हे खूप फायदेशीर आहे. चला उपाशीपोटी याच्या सेवनाचे फायदे जाणून घेऊया.

**रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतं –**

लसणाला प्रतिकारकशक्ती बळकट करण्यासाठी प्रभावी मानले आहे. अभ्यासात आढळून आले आहे की जे लोक दररोज लसणाचे सेवन करतात, त्यांना इतर लोकांपेक्षा सर्दी-पडसे कमी होते. सकाळी उपाशीपोटी त्याचे सेवन करणं जास्त फायदेशीर आहे.

**उच्च रक्तदाब असल्यास फायदेशीर –**

ज्या लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या आहे, त्यांनी दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन करावे, कारण यामध्ये रक्तदाब नियंत्रित करण्याचे गुणधर्म आढळतात. लसूण चावून खाल्ल्याने उच्च रक्तदाबात आराम मिळतो.

**हृदयाचा धोका कमी होतो –**

लसूण हृदयरोगाच्या धोक्याला कमी करतं. जर हृदयाच्या रोगापासून वाचायचे असल्यास दररोज सकाळी लसणाचे सेवन करावे. मधासहदेखील लसणाचा सेवन करू शकतो. यामुळे रक्ताभिसरण योग्य राहते.

**पोटाशी निगडित त्रासापासून सुटका –**

दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन केल्यास पोटाशी निगडित त्रास जसे की बद्धकोष्ठता आणि गॅसपासून आराम मिळू शकतो. यामुळे पाचक प्रणालीदेखील चांगली राहील. जे लोक ॲसिडिटीच्या त्रासामुळे त्रस्त झाले आहेत, त्यांना भाजके लसूण खाण्याचा सल्ला दिला जातो.

## वजन कमी करण्यासाठी दिवसाला किती पोळ्या खाव्यात?

**आपल्या दररोजच्या कॅलरीच्या प्रमाणाला लक्षात घेता पोळी किंवा भाकरीचे सेवन करावे. यामुळे आपल्या वाढत्या वजनाला कमी करण्यास मदत मिळेल. वजन कमी करण्यासाठी लोक आपल्या आहाराची काळजी घेतात. वास्तविक शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी कार्बोहायड्रेट घेणे टाळावे लागते. कार्बोहायड्रेटमुळे वजन झपाट्याने वाढते. पण कार्बोहायड्रेट हे आवश्यक मायक्रोन्यूट्रिएंट आहे, ज्याला वगळून चालणार नाही.**

भारतातील आहाराबद्दल बोलायचे झाल्यास पोळी आणि भात हे कार्बोहायड्रेटचे चांगले स्रोत आहेत. जवळजवळ प्रत्येक घरात भात आणि पोळ्या नियमितपणे लोक खातात. परंतु जेव्हा वेळ येते वजन कमी करण्याची, तेव्हा लोकांना हे जाणून घ्यायचे असते की, दररोज किती पोळ्या खाव्या, जेणेकरून वजन वाढणार नाही. चला तर मग जाणून घ्या -



**गव्हामध्ये पौष्टिक घटक आढळतात :**

पोळ्यांमध्ये फक्त कार्बोहायड्रेटचं नव्हे तर इतर आवश्यक पोषक घटक देखील आढळतात. गहू हा प्रथिने, फॅट, फॉस्फरस, मॅग्नेशियम, फॉलेट आणि लोहाचा सर्वात चांगला स्रोत आहे. पोळी किंवा चपाती खाल्ल्याने शरीरास सर्व पोषक घटक मिळतात.

**दिवसात किती पोळ्या किंवा भाकऱ्या खाव्या?**

कार्बोहायड्रेट, प्रथिनं आणि फॅट किंवा चरबीला मायक्रोन्यूट्रिएंट म्हणतात. शरीरातील विविध कार्ये करण्यासाठी आपल्या शरीरास यांची गरज पडते. सर्वप्रथम आपल्याला हे ठरवावे लागणार की आपल्याला दररोज किती प्रमाणात कार्बोहायड्रेट घ्यायचे आहे. त्यानुसारच आपण दिवसाचा पोळीचा किंवा भाकरीचा आहार ठरवावा. ६ इंचाच्या लहान पोळीमध्ये ७१ कॅलरी आढळते. आपण दुपारच्या जेवणात ३०० कॅलरी घेतो, तर आपण दोन पोळ्या खाऊ शकतो. यापासून आपल्याला १४० कॅलरीज मिळतात आणि बाकीच्या कॅलरी आपल्याला सॅलड आणि भाज्यांपासून मिळते. लक्षात ठेवा की पोळीशिवाय आपण ज्या भाज्या आणि फळ घेत आहात त्यांच्यामध्ये देखील कार्बोहायड्रेट आढळते. म्हणून आपल्या कॅलरीच्या सेवन करण्यावरच हे अवलंबून आहे की आपल्याला दिवसात किती पोळ्या खायला हव्या. दिवसातून चार पोळ्या खाणे वजन कमी करण्यासाठी चांगले मानले जातो.

**पोळीचे इतर पर्याय :**

जर आपण वजन कमी करण्यासाठी प्रयत्नरत आहात, तर आपण गव्हाच्या पोळीव्यतिरिक्त ज्वारीची किंवा बाजरीची भाकरी देखील खाऊ शकता. या भाकऱ्या गव्हाच्या पोळीपेक्षा आरोग्यवर्धक असतात आणि यामध्ये कार्बोहायड्रेट कमी तर इतर पोषक घटक मुबलक प्रमाणात असतात.

**हे लक्षात घ्या :**

आहारात फक्त कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी केल्याने वजन कमी होत नाही. यासाठी आपल्याला इतर गोष्टी जशा की आपली जीवनशैली, झोपण्याची पद्धत आणि नियमितपणे व्यायामाची दिनचर्या या गोष्टी देखील आवश्यक आहेत. निरोगी आणि संतुलित आहारासह या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवं.

## किचन स्वच्छ ठेवण्यासाठी काही टीप्स

**दररोज नोकरी किंवा व्यवसायामुळे आपल्याला आपल्या कामामधून वेळ मिळत नाही. अशा वेळी आपल्याला दररोज किचन स-ाफ करणे जमत नाही. त्यामुळे ज्या गृहिणी कामामध्ये व्यस्त असतात, अशा गृहिणींसाठी काही खास टीप्स...**



- **डायनिंग टेबल :** डायनिंग टेबल हे दररोजच्या जेवणामुळे घाण झालेले असते. त्यामुळे डायनिंग टेबलला स्वच्छ करण्यासाठी नीलगिरीच्या तेलाचा वापर करू शकता. टेबलमधून दुर्गंधी येत असल्यास एखाद्या कापडावर नीलगिरी तेलाचे काही थेंब टाकून त्याने पुसून घ्या.
- **फ्रीजः** फ्रीजचे दार उकडलेल्या बटाट्याच्या सालींनी स्वच्छ केले जाऊ शकते.
- **नळ :** किचनमधील नळ चकचकीत करण्यासाठी त्यावर थोडीशी टूथपेस्ट लावा आणि गरम पाण्याने धुऊन टाका.
- **कचऱ्याचा डबा :** किचनमध्ये जिथे कचऱ्याचा डबा ठेवतो, ती जागा नियमितपणे फिनेल टाकून स्वच्छ करावी. कारण सर्वात जास्त घाण त्या जागेवर जमते. त्यामुळे बॅक्टेरिया पसरतात. किचनमध्ये नेहमी झाकण असलेले कचऱ्याचे डबे वापरा.
- **मिक्सर :** मिक्सर वापरताना तो वापरून झाल्यावर त्यावरील घाण स-ाफ करून त्याला कव्हर घालून ठेवा. त्यामुळे त्यावर धूळ जमा होत नाही.
- **स्टोव्ह :** स्टोव्ह स्वच्छ करण्यासाठी संत्र्याचे साल वापरा. त्याने स्टोव्हला रॉकेलचा जास्त वास येत नाही.

# उंच गणेशमूर्तींच्या विसर्जनाचा संभ्रम कायम

## राज्य सरकारच्या भूमिकेनंतर पालिकेची कार्यवाही

**मुंबई :** प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूतीचे विसर्जन समुद्र, नैसर्गिक तलाव व नद्यांमध्ये करण्यास उच्च न्यायालयाची बंदी कायम आहे. त्यामुळे मुंबईतील लालबागच्या राजासह मोठ्या पीओपी गणेशमूर्तींचे विसर्जन करायचे कुठे, असा प्रश्न मुंबई महानगरपालिकेला पडला असून राज्य सरकारच्या धोरणानंतरच चित्र स्पष्ट होईल, अशी माहिती पालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

अवघ्या काही दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला आहे. मात्र, अद्यापही पीओपी मूर्तीच्या विसर्जनाबाबतचा तिढा सुटला नाही. याबाबतचा निर्णय राज्य सरकारने घ्यावा, असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले आहेत. परंतु राज्य सरकारकडून अद्याप विसर्जनाचे धोरण निश्चित न झाल्यामुळे मुंबई महानगरपालिकेला मोठ्या गणेशमूर्तीचे विसर्जन करायचे कुठे, असा प्रश्न पडला आहे.

राज्यातील अन्य शहरांपेक्षा मुंबईत दरवर्षी मोठ्या गणेशमूर्तीची संख्या वाढत आहे. यामध्ये १५ फुटांपासून ३० फुटांपर्यंतच्या गणेशमूर्तींची संख्या सुमारे ६ ते ७ हजार आहे, तर अशा उंच मूर्तीचे कृत्रिम तलावांत विसर्जन करणे शक्य नाही. या मूर्तीसाठी समुद्र व मोठे नैसर्गिक तलाव हाच एकमेव पर्याय सध्या आहे. परंतु उच्च न्यायालयाची समुद्रासह नैसर्गिक तलावात पीओपी गणेशमूर्ती



### कृत्रिम तलाव उभारणे शक्य नाही

एखादे कृत्रिम तलाव तयार करून गणपतींचे विसर्जन करता येईल. परंतु शहरातील मोठ्या गणेशमूर्तीची संख्या लक्षात घेता, मोठ्या संख्येने कृत्रिम तलाव उभारणे शक्य नसल्याचे महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. त्यामुळे मोठ्या गणेशमूर्तीच्या विसर्जनाबाबत सरकार कोणता पर्याय देणार यावर मुंबईतील गणेशमूर्तीचे विसर्जन अवलंबून राहणार असल्याचे महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले.

परवानगी नाही. यासाठी, राज्य सरकारकडून पीओपी गणेशमूर्तींच्या विसर्जनाबाबत धोरण निश्चित करण्यात येणार आहे. हे धोरण निश्चित झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल २३ जुलैला उच्च न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे या धोरणानंतरच मुंबईतील गणेशमूर्ती विसर्जनाबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे महापालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. तसेच, मोठ्या मूर्तीसाठी पालिकेकडे कोणतीच पयार्यी व्यवस्था नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# मुंबईत साथीच्या आजारांचा विळखा रुग्णसंख्येत दुपटीने वाढ

**मुंबई :** मुंबईत पावसाला सुरुवात झाली असून साथीच्या आजारांनी डोके वर काढले आहे. जून महिन्यात दररोज सरासरी २९ जणांना मलेरिया आणि ३१ जणांना गॅस्ट्रोची लागण होत असल्याची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाने दिली. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा मात्र मलेरिया आणि गॅस्ट्रोच्या रुग्ण संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे मुंबई पालिकेच्या आरोग्य विभागाने नागरिकांना परिसरात स्वच्छता राखण्याचे आणि काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

मुंबईमध्ये दरवर्षी पावसाळ्यादरम्यान साथीच्या आजारांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे दिसून येते. यावेळी मुंबईकरांना मलेरिया आणि गॅस्ट्रो सारख्या संसर्गजन्य आजारांचा सामना करावा लागत आहे. तर, यंदा दूषित पाण्यामुळे आणि अन्नामुळे पोटाचे आजारही वाढत आहेत. दरम्यान, गेल्या वर्षी जूनमध्ये ४४३ मलेरिया रुग्ण आढळले होते. तर यंदा ही संख्या दुपटीने वाढून ८८४ वर पोहोचली आहे. तसेच, गॅस्ट्रोच्या रुग्णांची संख्या गेल्या वर्षीच्या ७२२ वरून यंदा ९३६ इतकी झाली आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली.






# पाडकामाचा खर्च जमीन मालकांकडून वसूल करणार

**ठाणे :** मुंब्रा-शीळ परिसरातील खान कंपाऊंड परिसरात उभारण्यात आलेल्या बेकायदेशीर बांधकाम पाडकामाचा खर्च संबंधित जमीन मालकांकडून वसूल करण्यात येणार आहे. पालिका प्रशासनाने कायद्यात असणा□या तरतुदीनुसार संबंधित पाड कामाचा खर्च वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेर्शानुसार ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत शिळ भागातील खान कंपाऊंडमधील अनधिकृत २१ इमारतींवर महापालिकेने कारवाई सुरू केली असून त्यातील १८ इमारती आतापर्यंत जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. उर्वरित तीन इमारतींवर कारवाई सुरू आहे. परंतु या कामासाठी झालेला खर्च आता महापालिका वसूल करणार असून त्यानुसार ४.५० कोटींच्या आसपास बोजा त्या जागा मालकांवर टाकला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. आता झालेल्या खचार्चा अंदाज बांधण्याचे काम सुरू झाले आहे. दुसरीकडे प्रभाग समितीच्या बीट निरीक्षकांनी केलेल्या पाहणीत आढळलेल्या १२४ अनधिकृत बांधकामांवर महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने कारवाई केली आहे. शिळ भागातील खान कंपाऊंड येथे उभारण्यात आलेल्या ५.५० एकर जमिनीवरील १७ इमारती तोडण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले होते. त्यानुसार १९ जूनपासून महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत ही कारवाई सुरू झाली आहे. ही कारवाई करीत असताना याठिकाणी आणखी ४ अधिकच्या इमारती आढळल्या आहेत. त्या इमारतींवर देखील कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईसाठी पोकलेन, जेसीबी, गॅसकटर, ट्रॅक्टर ब्रेकर, मनुष्यबळ यांचा वापर करण्यात येत आहे. पोलीस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांच्या बंदोबस्तात ही कारवाई करण्यात येत आहे. परंतु या इमारतींच्या पाडकामांसाठी महापालिकेचे मनुष्यबळ, साहित्य, यंत्रणा आदींसह वेळही वाया गेला असल्याने आता याचा खर्च महापालिका वसूल करणार आहे. त्यानुसार झालेल्या खचार्चा अंदाज बांधला जात असून आतापर्यंत ४.५० कोटींच्या आसपास खर्च झाला असल्याची माहिती समोर आली आहे.

### कारवाईच्या आकडेवारीचा तक्ता

- नौपाडा-कोपरी : १०
- दिवा : २८
- मुंब्रा : १५
- कळवा : १२
- उथळसर :११
- माजिवडा-मानपाडा : २०
- वर्तक नगर : १४
- लोकमान्य नगर : १०
- वागळे इस्टेट : ०४
- **एकूण : १२४**

### प्रत्येक अनधिकृत बांधकामावर कारवाई

महापालिका क्षेत्रात अनधिकृत चाळी, अनधिकृत बैठी बांधकामे, वाढीव शेड, वाढीव बांधकाम, आरसीसी इमारतीचे बांधकाम, अनधिकृत बंगले, नाल्यालगतचे बांधकाम, आरक्षित भूखंडावरील गोडावूनचे बांधकाम, अनधिकृत टर्फ या प्रकारच्या बांधकामांवर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई नियमितपणे सुरु राहणार आहे. हरित क्षेत्रातील बांधकामांचा शोध घेऊन त्यावरही कारवाई सुरु आहे. तसेच, खाडीकिनारा, अनधिकृत भरणी यावरही कारवाई करण्यात येत असल्याची माहिती अतिक्रमण विभागाने दिली.

# शक्तिपीठ महामार्गाच्या सध्याच्या आराखड्यात १०० टक्के बदल होणार : नितेश राणे

**ठाणे :** शक्तिपीठ महामागार्संदर्भात सध्या जनतेमध्ये गैरसमज पसरवण्याचे काम सुरू आहे. परंतु हा महामार्ग जनतेच्या हिताचा असून प्रत्येकाला विश्वासात घेऊनच हा महामार्ग होणार आहे. त्यामुळे सध्याच्या आराखड्यात १०० टक्के बदल होणार असल्याचा विश्वास पालकमंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी बोलताना दिला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शक्तिपीठ महामार्गाला मंजुरी देण्यात आल्यानंतर राज्यभरात विविध जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्गाला विरोध होत आहे. तर दुसरीकडे सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्येही शक्तीपीठ महामागार्ला मोठ्या प्रमाणात विरोध होताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर आज पालकमंत्री नितेश राणे जिल्ह्यात आले असताना यांनी माध्यमांशी संवाद साधत आपली भूमिका स्पष्ट केली.

नितेश राणे म्हणाले की, लोकांमध्ये गैरसमज पसरवून त्यांची डोकी भडकवण्याच काम सध्या सुरू आहे. हे मी कदापी खपवून घेणार नाही. शक्तिपीठ महामार्ग होताना प्रत्येकाला विश्वासात घेतल्यानंतरच शक्तिपीठ महामार्ग होणार आहे. शक्तिपीठ महामार्गाचा सध्याचा जो आराखडा आहे, तो आपल्यासाठी योग्य नाही हा प्लॅन १०० टक्के आम्ही बदलणार आहोत. शक्तिपीठ महामार्ग लोकांच्या हितासाठी आहे. तो मार्ग गोव्याकडे न जाता झिरो पॉईंट किंवा मळगावकडे जाईल अशी दक्षता घेण्यात येईल, असे नितेश राणे यांनी यावेळी स्पष्ट केले.



नितेश राणे म्हणाले की, शक्तिपीठ महामागार्संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची माझी चर्चा झाली आहे. तसेच कालच मी एमएसआरटीसी डिपार्टमेंटचे जे प्रमुख आहेत, त्यांच्याशीही माझी चर्चा झाली आहे. लोकांमध्ये गैरसमज पसरवण्याचा जो प्रयत्न होतोय त्यांना मी राज्य सरकारची स्पष्ट भूमिका सांगेन की, प्रत्येकाला विश्वासात घेतल्यानंतरच हा महामार्ग होणार आहे. माझी आणि खासदार नारायण राणे यांची दोन आठवड्यापूर्वीच जिल्हाधिकाऱ्यांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. त्या बैठकीमध्येच आम्ही स्पष्ट भूमिका संबंधित एमएसआरडीसी आणि अन्य अधिकाऱ्यांना सांगितले की, लोकांना विश्वासात घेऊनच महामागार्चे काम करायचे आहे.

संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत पण चर्चा झाली आहे. जे कोण विरोध करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही जनतेमधून निवडून आलेले लोकप्रतिनिधी आहोत. लोकांनी आम्हाला आठ-नऊ महिने अगोदरच आमच्या बाजूने मतदान केलेले आहे. त्यामुळे जनतेची चिंता आम्हाला जास्त आहे. लोकांचा आमच्यावर जास्त विश्वास आहे. ज्यांना जनतेने नाकारलेले आहे. ज्यांना घरी बसवलेले आहे. त्यामुळे त्यांनी लोकांची माथी भडकवण्याचा प्रयत्न करू नये. तरीही त्यांचे पण काही प्रश्न असतील तर त्यांच्याशी मी स्वतः पालकमंत्री म्हणून संवाद साधायला तयार आहे.

आम्हाला उगाच तिथे वातावरण खराब करायचे नाही. कुठल्याही प्रकारे पोलीस बळाचा वापर करायचा नाही. तरीही जे कोणी आंदोलन करत आहेत, त्यांची जी काही शिष्टमंडळे आहेत. त्यांनी जी काही कुठली तरी समिती केली असेल, त्यांच्या समितीने पालकमंत्री म्हणून माज्याशी येऊन बोलावे. त्यांच्या काही प्रश्नांची उत्तरे द्यायची असतील तर मी तयार आहे. कारण आमची भूमिका पारदर्शक आहे. आम्हाला काही लपवालपवी करायची नाही. नॅशनल हायवे तयार केला आहे. तसेच हा शक्तिपीठ हायवे पण लोकांच्या विकासासाठी केला जाईल आणि म्हणून तो मार्ग गोव्याकडे न जाता आता मळगाव किंवा झिरो पॉईंट असा आम्ही सुचवणार आहोत आणि मान्य करून घेण्याची जबाबदारी ही आमची असेल. त्यामुळे याबाबतीमध्ये कुठलाही विरोध करण्याची काही गरज नाही, असे मत नितेश राणे यांनी व्यक्त केले.

## वायुसेना स्थानक परिसर फेरीवालामुक्त होणार

# ना फेरीवाला क्षेत्र करण्याचा पालिकेचा निर्णय

**ठाणे :** ठाणे शहरातील कोलशेत परिसरात वायुसेनेचे महत्त्वाचे स्थानक आहे. संवेदनशील असलेल्या या परिसरात फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्यामुळे रस्त्यावर चालणे देखील जिकरीचे झाले होते. कोलशेत भागातील वायुसेनेच्या स्थानकाजवळील अकबर कॅम्प परिसरातील रस्त्यावर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केले आहे. याठिकाणी खाद्यपदार्थांच्या गाड्यांमुळे वाहतूककोंडी होत असून त्याचबरोबर या गाड्यांवरील ज्वालाग्राही उपकरणांमुळे स्फोट होऊन अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात होती. या संदर्भात वायुसेनेच्या अधिकाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर खडबडून जाग आलेल्या ठाणे महापालिकेने आता कोलशेत रस्त्यावरील डी-मार्टपासून ते कोलशेत गाव आणि लोढा अमारा वाय जंक्शनपासून वायुसेनेच्या स्थानकापर्यंतच्या अकबर कॅम्प परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजू ना फेरीवाला क्षेत्र करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे हा रस्ता फेरीवालामुक्त होण्याची चिन्हे आहेत.




### वायुसेनेच्या तक्रारीनंतर पालिकेला जाग

वायुसेनेच्या अधिकाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर खडबडून जाग आलेल्या ठाणे महापालिकेने आता कोलशेत रस्त्यावरील डी-मार्टपासून ते कोलशेत गाव आणि लोढा अमारा वाय जंक्शनपासून वायुसेनेच्या स्थानकापर्यंतच्या अकबर कॅम्प परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजू ना फेरीवाला क्षेत्र करण्याचा निर्णय घेतला आहे. याठिकाणी नो पार्किंग क्षेत्र असे फलकही लावण्यात येणार आहे. यासंबंधीच्या प्रस्तावास प्रशाकीय सभेने मान्यता दिल्याने हा परिसर फेरीवालामुक्त होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

घोडबंदर रस्त्याला पयार्यी रस्ता म्हणून ओळखले जाते. या मार्गावरून अनेक नागरिक प्रवास करतात. काही वर्षांपूर्वी या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले. घोडबंदरच्या मुख्य मार्गावर कोंडी होत आहे. ती टाळण्यासाठी अनेकजण कोलशेत मागार्ला पसंती देत प्रवास करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे या मार्गावर वाहनांचा भार मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. त्यातच गेल्या काही वर्षांपासून डी-मार्टपासून ते कोलशेत गाव आणि लोढा अमारा वाय जंक्शनपासून वायुसेनेच्या स्थानकापर्यंतच्या अकबर कॅम्प परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजूस फेरीवाल्यांनी ठाण मांडले होते. रस्त्यावर तसेच पदपथावर फेरीवाले गाड्या लावत असून यामध्ये खाद्य पदार्थांच्या गाड्यांसह पानटपऱ्यांचा समावेश आहे. पानटपऱ्या आणि खाद्य पदार्थ बनविणाऱ्या गाड्यांवर राजरोजसपणे गॅस आणि स्टोव्हसारखी उपकरणे वापरली जात असून या गाड्या रात्री उशीरापर्यंत सुरू असतात.

### खाद्य पदार्थांच्या गाड्यांमुळे गर्दी

अकबर कॅम्प रोडला लागूनच भारतीय वायुसेनेचे स्थानक आहे. त्यामुळे हा परिसर अतिसंवेदनशील क्षेत्र म्हणून ओळखला जातो. या क्षेत्रात पानटपऱ्या आणि खाद्य पदार्थ विक्रीच्या गाड्यांमध्ये मोठी वाढ होत असून यामुळे सुरक्षिततेचा आणि वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत आहे. याच परिसरात आयटीपार्क असून तेथील कर्मचारी या गाड्यांवर खाद्य पदार्थ खरेदीसाठी गर्दी करतात. या गाड्यांचा त्रास पादचारी आणि लोढा अमारा आणि लोढा स्टर्लिंग या गृहसंकुलातील नागरिकांना होत आहे. त्यामुळे नागरिकांकडून कारवाई करण्याची मागणी होत होती.

## एचएसआरपी नंबरप्लेटसाठी एक लाख ६८ हजार ऑनलाइन अर्ज

# १५ ऑगस्टपूर्वी अंमलबजावणीचे परिवहन विभागाचे आवाहन

**ठाणे :** राज्यातील सर्वच वाहनांवर एचएसआरपी (हाय सिक्युरिटी नंबरप्लेट) बसवणे आता शासनाने बंधनकारक केल्याने ठाणे जिल्ह्यात याचे तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या संकेतस्थळावर आतापर्यंत तब्बल १ लाख ६८ हजार वाहनधारकांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज दाखल केला आहे.

बनावट नंबरप्लेटमुळे होणारे गुन्हे, चोरीची वाहने, चुकीची ओळख आणि वाहतुकीशी संबंधित अनेक गुंतागुंतीचे प्रश्न लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाने सर्व वाहनांवर हाय सिक्युरिटी नंबरप्लेट अनिवार्य केली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी ४ डिसेंबर २०२४ रोजी शासनाने आदेश जारी केला असून, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनधारकांना नवीन एचएसआरपी बसवणे आवश्यक आहे. याप्रकरणी गती देणे गरजचे आहे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेला गती मिळाली असून, आतापर्यंत १ लाख ६८ हजार अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १ लाख ४३ हजार वाहनधारकांना अपॉइंटमेंट देण्यात आली आहे. त्यापैकी सुमारे १ लाख वाहनधारकांनी आपल्या वाहनावर नवीन एचएसआरपी यशस्वीरीत्या बसवले असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर यांनी दिली.




"हाय सिक्युरिटी नंबरप्लेट बसवण्याच्या कामासाठी परिवहन विभागाने तीन अधिकृत कंपन्यांची नेमणूक केली आहे. नागरिकांनी अनधिकृत विक्रेत्यांकडून अशा प्लेट बसवू नयेत, कारण अशा नंबरप्लेटची नोंद केंद्र सरकारच्या डेटाबेसमध्ये होत नाही. त्यामुळे त्याचे कायदेशीर महत्त्व राहत नाही. वाहन सुरक्षा आणि कायदेशीर नोंदणीसाठी हाय सिक्युरिटी नंबरप्लेट लावणे आता अपरिहार्य झाले आहे. प्रशासनाकडून वेळोवेळी जागरूकतेसाठी विविध उपक्रम राबवले जात असून ठाणेकर नागरिकांचा या मोहिमेला उत्तम प्रतिसाद लाभत आहे."

**-रोहित काटकर, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे**

# मुरुड पोलीस वसाहतीसाठी आत्मदहनाचा इशारा



मुरुडची पोलीस वसाहत (पाडल्यानंतर)

विशेष म्हणजे २०२२, २०२३ मध्येही पोलीस वसाहतीच्या धोकादायक स्थितीकडे लक्ष वेधण्याचे काम पद्मदुर्ग करत होते. अखेर, गेल्या वर्षी जीर्ण घरे पाडल्यात आली. त्यानंतर नवीन ससज्ज इमारती बांधण्याचे काम सुरू करणे अपेक्षित होते. मात्र, सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे. म्हणून पद्मदुर्ग मंडळाने आत्मदहनाचा इशारा सरकारला दिला आहे. त्यामुळे आता सरकार तातडीने निर्णय घेणार का, याकडे मुरुडकरांसह पोलिसांचेही लक्ष लागले आहे.

**पनवेल :** मुरुड पोलीस वसाहतीमधील जीर्ण घरे पाडून वर्ष झाले तरी नवीन इमारती बांधण्याचे काम सुरू झालेले नाही. परिणामी पोलिसांची प्रचंड गैरसोय होत आहे. त्यामुळे पोलीस वसाहत बांधण्याचे काम तातडीने हाती घ्यावे आणि याबाबतचा लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाने सरकारकडे केली आहे. एवढेच नाही तसा निर्णय न घेतल्यास १५ ऑगस्ट रोजी आत्मदहन करू, असा इशारा मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी दिला आहे. तसे पत्र त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्थानिक शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांनी दिले आहे.

मुरुडमधील पोलीस वसाहत म्हणजे बैठ्या चाळी होत्या. ही वसाहत इंग्रजांच्या काळात बांधली होती. अंदाजे २५ ते ३० बैठ्या खोल्या होत्या. त्या अतिशय जीर्ण झाल्या होत्या तसेच राहण्यास धोकादायक बनल्या होत्या. त्यामुळे पोलिसांनाही या घरांमध्ये भीती वाटत होती. अखेर पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाने दोन-तीन वर्षे सतत पाठपुरावा केल्यानंतर गेल्या वर्षी पोलिसांची ही धोकादायक बैठी घरे जमीनदोस्त करण्यात आले. मात्र, त्यालाही वर्ष झाले तरी सरकारने नवीन पोलीस वसाहत बांधण्याचे काम हाती घेतलेले नाही. याबाबत पद्मदुर्ग मंडळाने वारंवार निवेदने देऊन सरकारने लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रतिसाद मिळाला नाही.

अखेर, सरकारकडून काहीही प्रयत्न होत नसल्याचे पाहून पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाने 1 जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार महेंद्र दळवी यांना निवेदन पाठवले. या पावसाळी अधिवेशनात मुरुड पोलीस वसाहतीबाबत निर्णय न घेतल्यास आणि पोलिसांची गैरसोय दूर न केल्यास १५ ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम कार्यालयाच्या पटांगणात सकाळी ११ वाजता आत्मदहन करू, असा इशारा दिला आहे.

# जून महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस

**बोईसर :** पालघर जिल्ह्यात मान्सून हंगामातील सुरुवातीच्या जून महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. चांगल्या पावसामुळे पाणलोट क्षेत्रामध्ये झालेल्या दमदार पावसाने धरणांमध्ये देखील समाधानकारक पाणीसाठा तयार झाला आहे. पालघर जिल्ह्यात जून महिन्यात एकूण ५७६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. जिल्ह्यातील आठ तालुक्यांपैकी तलासरी तालुक्यात सर्वाधिक ७४७.८ मिलिमीटर तर मोखाडा तालुक्यात सर्वात कमी ४३०.६ मिलिमीटर पाऊस झाला. २०२४ मध्ये जून महिन्यात ३६७.१ मिलिमीटर पाऊस झाला होता. जून महिन्यात जिल्ह्यात सरासरी ४११.९ मिलिमीटर पाऊस होतो, त्या तुलनेत यावर्षी ५७६ मिलिमीटर म्हणजे सरासरी पेक्षा अधिक १३९.६ टक्के पावसाची नोंद झाली आहे. संपूर्ण महिन्यात अतिमुसळधार पाऊस न होता सातत्यपूर्ण पाऊस झाल्याने शेतकरी वर्गात देखील समाधानाची भावना असून पेरणी केलेल्या भाताच्या रोपांची जोमदार वाढ झाल्याचे दिसून येते.

## बदलापुरातील गोळीबारात युवक जखमी

# एक आरोपी अटकेत... दोघांचा शोध सुरू

**बदलापूर :** बदलापूर शहरात गुरुवारी दुपारी गोळीबाराची धक्कादायक घटना घडली. ही घटना आमदार किसन कथोरे यांच्या बंगल्यासमोरील मुख्य रस्त्यावर घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी एक आरोपी अटकेत असून दोघांचा शोध पोलीस घेत आहेत.

घटना दुपारच्या सुमारास घडली. बोराडपाडा रस्त्यावर राहणारा अल्ताफ शेख भाजी आणण्यासाठी बाहेर पडला असता, मागून आलेल्या तीन अज्ञात इसमांनी त्याच्यावर दोन राऊंड गोळीबार केला. त्यात एक गोळी त्याच्या खांद्यावर लागली असून त्याला तत्काळ बदलापूरमधील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेनंतर बदलापूर पोलिसांनी त्वरीत घटनास्थळी धाव घेतली. मुख्य आरोपी विवेक नायडू याला अटक करण्यात आली असून त्याचे इतर दोन साथीदार अद्याप फरार आहेत. या दोघांचा पोलीस शोध घेत आहेत, अशी माहिती पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली.




गोळीबाराची घटना आमदार किसन कथोरे यांच्या निवासस्थानासमोरील रस्त्यावर घडल्यामुळे पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून उल्हासनगर परिमंडळ, बदलापूर पोलीस व ठाणे गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकांकडून तपास सुरू आहे. फिर्याद नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. घटनेनंतर अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधव यांनी बदलापूर पोलीस ठाण्यास भेट दिली असून प्रकरण गांभीर्याने घेत तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे.

### दोघेही गुन्हेगारी पार्श्वभूमीचे

या प्रकरणात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली असून, जखमी अल्ताफ शेख व आरोपी विवेक नायडू हे दोघेही एकमेकांचे पूर्वीचे मित्र असून गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. त्यांच्या आपसातील वादातूनच ही गोळीबाराची घटना घडली असावी, अशी प्राथमिक शक्यता तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. याबाबतचा अंतिम तपशील पुढील तपासात उघड होणार आहे.

# कळवा-मुरबाड रस्त्याने घेतला तरुणाचा बळी

**मुरबाड :** कळवा-मुरबाड महामार्गावर सुरू असलेल्या चौपदरीकरणाच्या कामामुळे रस्त्याची झालेली चिखलातली दुरवस्था आता जीवघेणी ठरू लागली आहे. बुधवारी सकाळी हिंदू सेवा संघ फाटा, मुरबाड येथे चिखलात घसरून पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचा डम्परच्या चाकाखाली येऊन दुर्दैवी मृत्यू झाला. मृत तरुणाचे नाव रोहन राजेंद्र मलाह (२०) असे असून, तो जमील नगर येथे राहत होता. चिखलात साचलेल्या रस्त्यावरून जात असताना त्याची दुचाकी घसरली आणि मागून येणा□या डम्परचे चाक थेट डोक्यावरून गेल्याने जागीच मृत्यू झाला. महामार्ग विभाग आणि कंत्राटदाराने रस्त्यावर साचलेल्या चिखलाची कोणतीही सफाई न केल्यामुळे हा अपघात घडल्याचा आरोप नागरिक करत आहेत. रस्त्यावर कोणतेही सुरक्षा उपाय, दिशादर्शक फलक, पयार्यी मार्ग वा वाहतूक नियंत्रण नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. या प्रकरणी कंत्राटदारावर फौजदारी कारवाई करावी, मृताच्या कुटुंबाला नुकसानभरपाई द्यावी आणि भविष्यात अशा अपघातांना आळा घालण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com